## प्रकरण 4

## मराठा इतिहासलेखन

## जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार भारतात चांगला स्थिरावला होता. मुंबई, कलकत्ता, मद्रास येथील वखारींमधून मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू झालेला होता. बखारी, तटबंदी आणि सैन्याची खडी फौज या प्रक्रियेतून इंग्रजांनी भारतीय अर्थकारणात आणि राजकारणातही चांगला जम बसवायला सुरुवात केली. देशी राजसत्तांशी कधी सलोखा तर कधी संघर्ष करीत आपले वसाहती राज्य विस्तारणे चालू ठेविले. इंग्लंडमधल्या अनेक इंग्रज तरुणांना भारतात नवनवी क्षेत्रे उपलब्ध असल्याने भारताविषयी कुतूहल होते. भारतात येण्याचा प्रयत्न अशी काही तरुण मुले करायची. तसा इंग्लंड-भारत हा प्रवास काही फार सुखाचा नव्हता. वर्ष सहा महिन्यांचा समुद्रप्रवास करून भारतीय समुद्रकिनाऱ्यावर लोक उतरत. अशाच एका जहाजातून १६ वर्षे वयाचा एक स्कॉटिश मुलगा मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर उतरला, तो होता जेम्स कनिंगहॅम ग्रँटडफ.

**जन्म व बालपण -**

जेम्स कनिंगहॅम हा ग्रँट डफ या त्रोटक नावानेच ओळखला जातो. मुळातला स्कॉटिश असलेला हा ग्रँट स्कॉटलंडमधल्या बान्फ या शहरात एका सुखवस्तू कुटुंबात दिनांक ८ जुलै १७८९ या दिवशी किन्करडीन ओ. नीलच्या ग्रँट कुटुंबात जॉन ग्रँट आणि मागरिट मिलन डफ यांच्या पोटी जन्मला. ग्रँट डफच्या जन्मानंतर १० वर्षांनीच त्याचे वडील जॉन ग्रँट मृत्यू पावले. खरे तर १७८९ हे वर्ष युरोपच्या इतिहासातील अत्यंत धामधुमीचे वर्ष, फ्रान्समध्ये त्याच वर्षी राज्यक्रांती झाली आणि युरोपमध्ये स्वातंत्र्य समता आणि विश्वबंधुत्वाचा उद्‌घोष१ सुरू झाला. पुढे फ्रान्सने साऱ्या युरोपीय राजकारणावर मात केली. नेपोलियनचा उदय झाला. या साऱ्या धामधुमीत युरोपीय राजकारण गुंतले होते. इंग्लंडमधील परिस्थितीही गुंतागुंतीची होती.

वडिलांच्या मृत्यूनंतर ग्रँट डफच्या आयुष्यात तसे म्हटले तर चांगला योग आला. त्याच्या आईला मार्गरेट मिलन डफला डफ घराण्याची प्रचंड मालमत्ता वारसा हक्काने मिळाली. तसे ग्रँट घराणे काही फारसे श्रीमंत नव्हते. परंतु ग्रँट डफच्या आईकडून मात्र प्रचंड मालमत्तेचा वारसा लाभला. या प्रचंड संपत्तीमुळे खरे तर ग्रँट डफ आणि त्याची आई अत्यंत श्रीमंत बनली. ग्रँट डफचे शिक्षण स्कॉटलंडमध्येच अंबरडीन या शहरात झाले. इंग्रजीतला प्रसिद्ध कवी बायरन हा त्याचा सहाध्यायी असल्याची नोंद मिळते. ग्रँट डफला शिक्षणात विशेष रुची नव्हती. वयाच्या सोळाव्या वर्षी ग्रँट डफने अंबरडीन सोडले. प्रचंड श्रीमंत असलेल्या आपल्या आईविषयी त्याला विशेष आस्था दिसत नाही. अशा परिस्थितीत हा ग्रँट डफ भारताकडे येणाऱ्या एका जहाजात शिरला. १६ वर्षे वयाचा हा पोरगा या जहाजातून वर्ष सहा महिन्यांच्या समुद्र प्रवासानंतर मुंबईत येऊन पोहोचला. ईस्ट इंडिया कंपनीची वखार मुंबईत होतीच. तिचे सैन्यही होते. या सैन्यात तो कॅडेट म्हणून १८०६ साली रुजू झाला.

**ग्रँट डफचे भारतातले वास्तव्य -**

१६ वर्षे वयाचा एक स्कॉटिश तरुण म्हणून मुंबईच्या किनाऱ्यावर उतरलेला ग्रँट डफ सैन्यात कॅडेट म्हणून दाखल झाला. चार पाच वर्षांत त्याची लेफ्टनंटपदी नेमणूक झाली. शिक्षण अर्धवट सोडून मायदेशाहून हा इकडे आला असला तरी मुळात ग्रँट डफ एक हुशार मुलगा होता. नवे शिकण्याची जिद्द त्याला होती. भारतात आणि विशेषतः मुंबईत आल्यावर तो फार्सी भाषिकांच्या संपर्कात आला. त्याने फार्सी भाषा आत्मसात केली. सैन्यात फार्सी दुभाषी म्हणून त्याचे महत्त्व वाढले. १८१७ साली ग्रँट डफ पुण्यांत आला. पुण्याच्या रेसिडेंटपदी त्यावेळी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनची नेमणूक झाली होती. पेशवाईचा अस्त होत होता. ग्रँट डफ एल्फिन्स्टनच्या लष्करात रुजू झाला. २८ ऑक्टो. १८१७ ला खडकीची लढाई झाली. या लढाईतल्या यशाचा भागीदार ग्रँट डफही होता. इंग्रज-मराठे संघर्ष संपला. ग्रँट डफला कॅप्टनपदी बढती

मिळाली.

**सातारच्या पोलिटिकल एजंटपदी नेमणूक -**

१८१८ साली पेशवाईचा अस्त झाला. इंग्रजांनी सारी मराठी सत्ता काबीज केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आता सारा मराठी मुलुख आला. पुण्यातले पेशव्यांचे राज्यच संपल्यामुळे तिथे आता इंग्रजांच्या रेसिडेन्टची गरज उरली नाही. परिणामी पुण्याचा रेसिडेन्ट एल्फिन्स्टन आता पुण्याचा कमिश्नर झाला. १८१९ साली तो मुंबई इलाख्याचा गव्हर्नर झाला व त्या पदावर पुढे आठ वर्षे तो कायम राहिला. महाराष्ट्रात जवळपास पंचवीस वर्षे वास्तव्य झाल्याने एल्फिन्स्टनला या प्रदेशाची खडान् खडा माहिती झालेली होती. तो मूलतः उदारमतवादी होता. म्हणूनच महाराष्ट्रातील स्थानिक संस्था अधिक कार्यक्षम करण्यावर त्याचा भर होता. परकीय सत्ता स्थानिक लोकांना जाचक वाटणारच तो जाच कमी भासेल असे काहीतरी केले पाहिजे असे त्याला वाटू लागले. त्यातूनच स्थानिक स्वराज्य संस्था बळकट करण्याचा विचार आला.

पुण्याचे मराठी राज्य संपुष्टात आल्यानंतर निदान सातारची छत्रपतींची गादी तरी कायम राहिल्यास इंग्रजांविरुद्धची भावना काही प्रमाणात कमी होईल असा व्रिचार एल्फिन्स्टनने स्वीकारला. यामुळे आणखी एक गोष्ट घडली. इंग्रज हे शिवशाहीविरुद्ध नाहीत, मराठी राज्याविरुद्ध नाहीत तर पुंडशाही करणाऱ्या ब्राह्मणी मनसंब निर्माण करणाऱ्या पेशवाईतील अधिकाऱ्यांविरुद्ध त्यांचा खरा संघर्ष आहे, अशी एक भावना तात्पुरती का होईना निर्माण झाली. पेशवाईच्या जुलमी राजवटीतून छत्रपतीला मुक्त करून त्याला मर्यादित असे सार्वभौमत्व बहाल करून सातारच्या सिंहासनावर इंग्रजांनी बसवले तेव्हा इंग्रजांविषयीचा एक आभास निर्माण झाला होता. मराठ्यांचे, छत्रपतींचे पाठीराखे म्हणून इंग्रजांची प्रतिमा निर्माण झाली. तो केवळ एक भ्रम होता ही गोष्ट पुढे सिद्ध झाली.

११ फेब्रुवारी १८१८ रोजी सातारच्या सिंहासनावर मराठा राजा सिंहासनारूढ होईल हे एल्फिन्स्टनने जाहीर केले. ११ एप्रिलला कंपनी सरकार आणि छत्रपतींचे सरकार यांची दोस्ती झाल्याचे शे दोनशे जाहीरनामे कंपनी सरकारच्या शिक्के मोर्तब, निशाणासह निघाले. राजा प्रतापसिंह भोसले छत्रपती झाले. १४ एप्रिल १८१८ ला छत्रपती सातारच्या किल्ल्यावर राहण्यास गेले. पोलिटिकल एजंट म्हणून ग्रँट डफची नेमणूक साताऱ्यात झाली. ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने सातारचा कारभार पाहण्याची जबाबदारी ग्रँट डफवर येऊन पडली. एका अर्थाने सातारचे राज्य आणि राजा, एल्फिन्स्टनने ग्रँट डफच्या हवाली केला. ग्रँटला फार हुशारीने आणि चातुर्याने सातारचा कारभार करावयाचा होता. तो तर त्याने केलाच पण त्याचबरोबर सातारच्या दफ्तरखान्यातील कागदपत्रांआधारे मराठ्यांचा इतिहासही धुंडाळायचा यशस्वी प्रयत्न केला.

**मराठ्यांच्या इतिहासाचे लेखन -**

सातारचा पोलिटिकल एजंट म्हणून आणि एकूण राज्याची व्यवस्था पाहणारा ब्रिटिश अधिकारी या नात्याने ग्रँट डफवर तशी खूप जबाबदारी होती. दरबारातली सर्व कागदपत्रे त्याच्या हातातून जायची. दफ्तरखान्यातली जुनी कागदपत्रेही तो बघू शकत होता. या पार्श्वभूमीवर त्याला मराठ्यांचा इतिहास लिहावासा वाटला. खरे तर एल्फिन्स्टनलाच मराठ्यांच्या इतिहास लेखनात विशेष रुची होती; परंतु कार्यबाहुल्यामुळे त्याला ते जमले नाही. जेव्हा ग्रँट डफने अशा प्रकारच्या इतिहास लेखनाचा विचार त्याला लिहून कळवला तेव्हा त्याने तो विचार उचलून धरला आणि ग्रँट डफला प्रोत्साहित केले.

**साधनांची जुळवाजुळव -**

इतिहास लेखनाचा निश्चय होताच ग्रँट डफने एक जाहीरनामाच प्रस्तुत केला. त्या आधारे सातारा संस्थानातील रयतेला उद्देशून आज्ञा केली गेलीय की कुणाजवळ जर बखर, ताम्रपत्रे, जुन्या सनदा, वतनपत्रे, इनामपत्रे मराठी अक्षरांची, फारसी,

बालबोध किंवा संस्कृत कागदपत्रे, बिदर पादशाही, निजामशाही आदिलशाहीतील कागदपत्रे किंवा शिवाजी महाराजांचे, संभाजी महाराजांच्या कारकिर्दीची कागदपत्रे असतील तर ती दरबारात द्यावीत. ते आज्ञापत्र डेक्कन कॉलेजात रूमाल क्र.१ मध्ये उपलब्ध आहे. आज्ञापत्राचा पुढील भाग फाटलेला आहे; परंतु त्या आज्ञापत्रावरून इतिहासाच्या साधनांची जुळवाजुळव कशी सुरू झाली याची पूर्ण कल्पना येते.

**सातारचा दफ्तरखाना -**

सातारचा दफ्तरखाना म्हणजे मौल्यवान आणि अनेक अस्सल कागदपत्रांचा खजिनाच. शिवाजीराजांनी व्यंकोजीस लिहिलेली पत्रे, औरंगजेबाची मूळ फर्माने, सनदा, मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या काळातील अनेक कागदपत्रे या दफ्तरखान्यात आहेत. बरीचशी कागदपत्रे मधल्या धामधुमीच्या काळात नष्टही झाली. ग्रँट डफने या दफ्तरखान्यातील कागदपत्रांच्या नकला करून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. सातारचे राजे छत्रपती प्रतापसिंह सुरुवातीला कागदपत्रांचे बस्ते ग्रँट डफच्या स्वाधीन करण्यास राजी नव्हते. फडणीसामार्फत छत्रपतींनी ग्रँट डफला तसा निरोपही धाडला आणि पारसनीस व मुन्शीना नकला करण्याचे काम दिले. कागदपत्रे ग्रँटास दाखवून परत आणावीत अशी ताकीद छत्रपतींनी आपल्या अधिकाऱ्यांना दिली होती. ग्रँटने मराठी कागदपत्रे वाचून घेतली. त्यांचा मथितार्थ नोंदविला. बाळाजीपंत नातू, चिटणीस अशा काहींनी त्याला या कामी मदत केली. हॅचिनसन या गृहस्थाने मराठी कागदपत्रांचे भाषांतर करण्याचाही प्रयत्न केला. भाषांतर करणे तसे कठीण काम होते. १० हात लांबीच्या कागदातील कित्येकदा फक्त १० ओळीच उपयुक्त वाटत अशा वेळी या १० हात लांबीच्या कागदाचे भाषांतर करून घेणे निरर्थक ठरले.

ग्रँट डफने प्रदेश धुंडाळला. सर्व देशपांडे, वतनदार मंडळींना त्याने कामास लावले. मराठ्यांच्या इतिहासाचे अनेक कूट प्रश्न त्याला भेडसावत राहिले. त्यांचा माग तो काढत राहिला. मराठी राज्यातली प्रशासकीय पदे, प्रतिनिधीपद, सरदेशमुखी, मोकासा, चौथाई, अष्टप्रधान या साऱ्या गोष्टी समजून घेण्याचा ग्रँट डफने प्रयत्न केला. शिवकालासंबंधी पुरेशी माहिती मिळत नव्हती. ती मिळविण्याची त्याने धडपड केली. सातारचा दफ्तरखाना त्याने विस्ताराने धुंडाळला.

**फार्सी साधनांचा शोध -**

फार्सी कागदपत्रांच्या अभ्यासाशिवाय मराठ्यांच्या इतिहास लेखनाचे कार्य अपूर्ण राहील याची ग्रँट डफला पूर्ण कल्पना होती. त्याने फेरिस्ता अभ्यासला. खाफीखानाचा मुन्तखाब उल् तवारिख, अबुल हुसेनी काझी आणि मीर इब्राहिम यांच्या विजापूर तवारिखा, नुरूल्लाने लिहिलेली तवारिख, झुबेरीचा बुसातीन उल् सलातीन असे अनेक ग्रंथ त्याने वाचले व त्या आधारे मराठ्यांच्या इतिहासाचा आलेख रेखाटण्याचा प्रयत्न केला.

शिवपूर्वकाळाचा शोध घेण्यासाठी प्रमुख आधारभूत ग्रंथ म्हणून त्याने फेरिस्ताचे प्रवासवर्णन अभ्यासले. कॅप्टन जॉन ब्रिग्ज याने फेरिस्ताच्या प्रवासवर्णनाचा सखोल अभ्यास केला होता. एवढेच नव्हे तर खानदेशाचा कलेक्टर असतानाच त्याने हा ग्रंथ इंग्रजीत भाषांतरितही केला. पण फेरिस्ताच्या प्रवासवर्णनाचा शोध शिवपूर्वकालीन इतिहास नोंदवण्याच्या दृष्टीने फारसा उपयोगी ठरला नाही. त्यामुळे त्याला खाफीखानावर विसंबून राहावे लागले.

**औरंगाबादच्या हनीफकडून खाफीखानाचे हस्तलिखित -**

दरम्यान गॉर्डन या इंग्रज अधिकाऱ्याने खाफीखानाच्या इतिहासाचे इंग्रजी भाषांतर केले होते. तेही ग्रँट डफला मिळाले. १६०० ते १६५० या कालखंडातील माहितीची पोकळी खाफीखानाच्या इतिहासातून त्याने काही प्रमाणात भरून काढली. याच काळात इरस्कीनही खाफीखानाच्या इतिहासाचे फार्सीतून इंग्रजीत भाषांतर करण्याच्या प्रयत्नात गुंतला होता. खाफीखानाच्या इतिहासाची आणखी एक चांगली सुवाच्य अक्षरातली प्रत औरंगाबादच्या मोहम्मद हनीफ याने ग्रँट डफला दिली. ग्रँट डफला स्वतःला फार्सी येत होते. त्याने या प्रतीचा वापर अधिक केला असावा असे म्हटले जाते.

**ग्रंथ प्रकाशनासाठीची धडपड -**

ग्रंथलेखन करणे, त्यासाठी साधनसामग्री जमवणे, चिंतन मनन करणे या गोष्टी लेखकाच्या हाती असतात. पाच दहा वर्षांच्या परिश्रमाचे फलित म्हणून ग्रंथ लिहून तयार होतो. परंतु त्याला प्रकाशित होण्याचे भाग्य सहजासहजी लाभतेच असे नाही. ग्रंथ छापण्यासाठी प्रकाशक, मुद्रक मिळविणे हे मोठे जिकिरीचे काम. आजही ते जिकिरीचे आहे. ग्रँट डफचा मराठ्यांचा इतिहास लिहून तयार झाला. साधारणतः १३ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून म्हणजे मुस्लिमांच्या दक्षिण पठारावरील वर्चस्वाच्या आणि कालखंडापासून सुरुवात करून अनेक घटनांचा आढावा घेत मराठ्यांचा -हास आणि ब्रिटिश सत्तेचा उदय ग्रँट डफने आपल्या ग्रंथात रेखाटला. साधारणतः १८१९ पर्यंतच्या घडामोडीचा आढावा या ग्रंथात आला आहे. साधनांचे संदर्भ आणि एक नकाशाही या ग्रंथात समाविष्ट आहे. चित्रेही आहेत.

ग्रँट डफने हस्तलिखित लंडनमधील प्रसिद्धं प्रकाशक जॉन मरे याच्याकडे पाठवले. प्रकाशकाने असे सुचविले की ग्रंथ चांगला जमलाय पण नाव बदलावे लागेल. इकडे मराठ्यांना कोण ओळखतो ? मराठ्यांचा इतिहास या नावाने ग्रंथ खपणार नाही. मुघलांचे पतन, ब्रिटिशांचा उदय असे काहीतरी नावदेऊया. ग्रँटने या सूचनेला नकार दिला आणि हस्तलिखिताचे बाड उचलले. सर जेम्स मॅकिन्टॉशच्या मध्यस्थीने इंग्लंडमधल्या लाँगमन प्रकाशन संस्थेने हा ग्रंथ छापून तयार केला. इ.स. १८२६ साली ग्रंथ प्रकाशित झाला.

**ग्रँट डफ लिखित मराठ्यांच्या इतिहासाचे स्वरूप -**

ग्रँट डफने लिहिलेला हा मराठ्यांचा इतिहास एक महत्त्वपूर्ण ग्रंथ ठरतो. मराठ्यांच्या हालचालींची, मोहिमांची प्रथमच सविस्तर अशी माहिती या ग्रंथाद्वारे पाश्चात्त्य अभ्यासकांसाठी उपलब्ध झाली. मराठ्यांविषयी व त्यांच्या धडपडीविषयी या ग्रंथामुळे कुतूहल निर्माण झाले. केवळ मुघलांचा इतिहास आणि त्या अनुषंगाने अभ्यास करणाऱ्यांना आता मुघल मराठा असा एकत्रित अभ्यास करण्याची निकड भासू लागली. मराठी सत्तेसारखी एवढी प्रचंड शक्ती सतराव्या शतकात उदयाला कशी आली याचे समर्पक स्पष्टीकरण मात्र ग्रँट डफला देता आले नाही. मराठ्यांचा उदय म्हणजे सह्याद्रीच्या जंगलात अचानकपणे पेटलेला वणवा असावा असा पूर्णतया चुकीचा ग्रह या लिखाणातून निर्माण झाला. मराठ्यांच्या मोहिमांमागची वैचारिक बैठक नेमकेपणाने समजून न घेतल्याने शिवाजी महाराजांच्या लष्करी मोहिमा लूटमार करणाऱ्या हालचाली भासल्या व ग्रँट डफने तशी त्यांची नोंद केली. मराठी स्वराज्याच्या साऱ्या हालचाली या एका व्यापक अशा राजकीय उद्दिष्टांचा भाग होता. राजकीय डावपेच, लष्करी आडाखे दोन्ही राजकीय सत्तांमधील संघर्षात येणाऱ्या या स्वाभाविक गोष्टी आहेत; परंतु ही गोष्ट नजरेआड करून शिवाजीवर अफझलखान प्रकरणी दोषारोप करणे, पुरंदरच्या किल्ल्यावरील हल्ल्यासंबंधात मराठ्यांना दोषी धरणे अशा काही आक्षेपार्ह नोंदी ग्रँट डफच्या इतिहासात होत्या.

ग्रँट डफच्या इतिहासामुळे मराठ्यांच्या इतिहासाबद्दल जागरुकता निर्माण झाली. महाराष्ट्रातील अभ्यासकांनी अत्यंत काळजीपूर्वक हा ग्रंथ वाचला. त्यातले दोष टिपले. त्रुटी लक्षात घेतल्या व त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने साधनांचा धांडोळा सुरू ठेविला. मराठ्यांच्या इतिहासावर ग्रंथ लेखन सुरू ठेविले.

ग्रँट डफला या ग्रंथातून लेखक म्हणून मानधन किती मिळाले हा प्रश्न गौण असला तरी या लिखाणाच्या प्रक्रियेत, प्रकाशनात त्याला जवळ जवळ १७०० पौंडाची खोटच बसली. १८४० च्या सुमारास पहिली आवृत्ती संपली. इतिहासाच्या अभ्यासक्रमात हे पुस्तक अजून समाविष्ट नव्हते. भारतात तर विद्यापीठांची स्थापनाच १८५७ नंतर होते. तरीही भारतातल्या विशेषतः पश्चिम भारतातल्या म्हणजे मुंबई प्रेसिडेन्सीतल्या मुलकी अधिकाऱ्यांना ग्रंथ उपयुक्त ठरला. १८६३ ला टाईम्स ऑफ इंडिया प्रकाशन संस्थेने या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढली. पुढील १० वर्षात तिसरी आवृत्ती निघाली. आणखी पाच वर्षात चौथी आवृत्ती काढली. हा ग्रंथ लोकप्रिय म्हणण्यापेक्षा वाचकप्रिय बनल्याची ही

पावती होती. १९१६ पर्यंत ग्रँट डफने लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या सहा आवृत्त्या निघाल्या. गुजराथी आणि हिंदीतील या ग्रंथाचे भाषांतरही प्रकाशित झाले. मराठी भाषांतर मात्र प्रकाशित झाले नाही.

**ग्रंथाचे परीक्षण -**

ग्रँट डफने लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचे वाचक प्रामुख्याने महाराष्ट्र गुजराथ परिसरातील कंपनी नरकारातील महसूल अधिकारी होते. क्वचित एखाद्या ठिकाणी राजेसाहेबांनी हा ग्रंथ वाचला असावा. १८४८ च्या दरम्यान सांगलीच्या पटवर्धनांनी तो वाचून घेतल्याची नोंद सापडते. मुंबईत रॉयल एशियाटिक सायटीच्या बैठका होत. या बैठकांतून भारतीय अभ्यासाविषयी म्हणजे इंडॉलाजिकल स्टडीजविषयी चर्चा न. त्याच अनुषंगाने मराठ्यांच्या इतिहासाविषयी आणि पुराभिलेखीय साधनांविषयी विचार १४ मार्च १८६७ या दिवशीच्या बैठकीत झाला. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचा सचिव या नात्याने जेम्स टेलर यांनी ग्रँट डफच्या पुस्तकाचे परीक्षण केले आणि एक परिपूर्ण ग्रंथ म्हणून त्याचा उल्लेख केला. मुलकी अधिकाऱ्यांनी ग्रंथ वाचला पण ग्रंथ परीक्षणाच्या भानगडीत त्यांच्यापैकी कुणी पडले नाही.

ग्रँट डफचा हा ग्रंथ म्हणजे मराठ्यांचा इतिहास नोंदवण्याचा पहिला प्रामाणिक प्रयत्न होय. एलफिन्स्टन आणि थॉमस मन्रो यांच्या सल्ल्यानुसार ग्रँट डफने सर्व कागदपत्रे मिळवली. त्यांची जुळवणी केली. सार काढले आणि त्या आधारे हा ग्रंथ लिहिला. या मूळ ग्रंथातील संदर्भयादी पाहता हे जाणवावे. ग्रँट डफने हा ग्रंथ लिहिताना चिटणीसबखर, शहाजहानची फर्माने, औरंगजेबाची काही पत्रे, १७०७ नंतरचा मोगलांचा पत्रव्यवहार, महजर, तहनामे, सनदा, शिवाजीची दोन पत्रे आणि पेशव्यांच्या पत्रव्यवहारातील काही पत्रे ही साधने प्रामुख्याने वापरली. सातारच्या दफ्तरखान्यातली कागदपत्रेही उपयोगात आणलेली दिसतात. याचबरोबर फार्सी कागदपत्रांचाही उपयोग मोठ्या प्रमाणात केला गेला हे या ग्रंथाच्या वाचनातून स्पष्ट होते.

इतिहासाचे लेखन हे कधीही परिपूर्ण नसते. इतिहास-लेखन ही सतत चालू राहणारी एक प्रक्रिया आहे. इतिहास लेखनाला उपलब्ध झालेली साधने व त्यांतून मिळालेल्या माहितीच्या आधारेच तो इतिहास-लेखन करीत असतो. या मर्यादा प्रत्येक इतिहास लेखनाला असतात तशा त्या ग्रँट डफच्या इतिहास लेखनालाही होत्या. त्याला उपलब्ध झालेली मराठी आणि फार्सी साधने त्याने पुरेपूर वापरली. त्याआधारे इतिहास रेखाटला. काही गोष्टींच्या संदर्भात त्याला पुरेसी माहिती मिळाली. काहींच्या संदर्भात चुकीची माहिती मिळाली तर काहींच्या संदर्भात माहिती मिळालीच नाही. अशाही परिस्थितीत पाश्चिमात्यांना मराठ्यांच्या इतिहासाची कल्पना देण्याच्या उद्देशाने ग्रँट डफने या ग्रंथाची रचना केली आणि तो ग्रंथ त्या मर्यादेत चांगला लिहिला गेला हे नोंदवावेच लागेल. ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर त्याचे परीक्षण होऊ लागले. त्यातल्या त्रुटी उल्लेखिल्या जाऊ लागल्या. ग्रंथावर टीका टिप्पणी होऊ लागली. हे स्वाभाविकही होते. पुस्तक परीक्षण म्हटले म्हणजे हे सारे ओघाने येतेच.

**नीलकंठ जनार्दन कीर्तनेची टीका -**

आजपासून १५० वर्षापूर्वीचे बी. ए. चे विद्यार्थी नवीन प्रकाशित ग्रंथाबद्दल किती जागरुक असत याचे उदारहण म्हणून खरे तर नीलकंठ जनार्दन कीर्तन्यांचा उल्लेख व्हायला हवा. डेक्कन कॉलेजात बी. ए. च्या वर्गात शिकणाऱ्या या विद्यार्थ्याने जिज्ञासेपोटी ग्रँट डफचा मराठ्यांचा इतिहास हा इंग्रजी भाषेतला ग्रंथ वाचला. त्यावर एक निरूपणात्मक टिपण तयार केले आणि पूना यंग मेन्स असोसिएशनच्या बैठकीत ते टिपण वाचले. हे टिपण म्हणजे ग्रँट डफच्या ग्रंथावरील पहिली अभ्यासपूर्ण टीका होय.

कीर्तन्यांच्या टीकेचा मुख्य रोख हा मराठ्यांच्या इतिहासाची पार्श्वभूमी म्हणून जे काही ग्रँट डफने लिहिले त्या संदर्भाकडे आहे. हा भाग अत्यंत त्रोटक स्वरूपात मांडला गेला. हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञानविषयक महाराष्ट्रातील संस्कृत, प्राकृत लेखन परंपरेबाबत ग्रँट डफ पूर्णपणे अनभिज्ञ आहे हे त्यांनी स्पष्टपणे लिहिले. ग्रँट डफला प्राचीन इतिहासाविषयी संगतवार माहितीच नाही. मराठे कोण कुठले याचाही तो शोध घेऊ शकलेला नाही. मोहिमांविषयी पुरेपूर माहिती त्याने संकलित केली, मात्र मोहिमांचे वर्णन हृदयाला भिडत नाही. व्यक्तींच्या शौर्याच्या, युक्तिप्रयुक्तीच्या

धूर्ततेच्या गोष्टी वगळून मोहिमा वर्णिल्या गेल्यामुळे ही मोहिमांची जंत्री झाली आहे असे त्यांनी सार्थपणे म्हटले. मराठ्यांच्या इतिहासावरील इंग्रजीतली एक बखर या शब्दांत या ग्रंथाची शेवटी भलावण करण्यात आली.

कीर्तन्यांने केलेली टीका तशी गांभीर्याने घेण्याची गरज नव्हती. परंतु त्या काळातल्या एका विद्यार्थ्यान हा ग्रंथ किती गांभीर्याने वाचला आणि त्यावर टिपण तयार केले ही गोष्ट इंग्रजी शिक्षणाच्या प्रारंभ काळातली लक्षणीय गोष्ट होती. त्या काळातही कदाचित कीर्तन्यांसारखे विद्यार्थी अपवादात्मक असतील. पण आजे मात्र ते अपवादही अदृश्य झाले आहेत. चिपळूणकरांनी कीर्तन्यांचे कौतुक करणे स्वाभाविक होते. निबंधमालेतून त्यांनी मराठ्यांच्या बखरीवरील टीका या कीर्तने लिखित टिपणीचा आवर्जून उल्लेख केला.

न्या. रानडे, इतिहासाचार्य राजवाडे आणि वासुदेव शास्त्री खरे यांच्या प्रतिक्रिया ग्रँट डफचा इतिहास' उपलब्ध झाल्याबरोबर अनेकांच्या वाचनात तो ग्रंथ आला. तो ग्रंथ वाचतानाच काही गोष्टी काही वाचकांच्याही ध्यानी आल्या. मराठ्यांचा हा इतिहास नोंदवताना ग्रँट डफने चिटणीस बखरीला अनन्यसाधारण महत्त्व दिले. त्या आधारेच बरेचसे विवेचन आहे. अगदी मर्यादित अशीच मराठी कागदपत्रे त्याने वापरलेली दिसतात. फार्सी कागदपत्रे ग्रँट डफने धुंडाळली खरी, पण तेथेही अधिक विश्वास त्याने खाफीखानावर ठेवला. साहजिकच मराठ्यांच्या इतिहासाची सारी मांडणी औरंगजेबाला केंद्रीभूत मानून करण्यात आली. अनेकांना ही मांडणी साहजिकच रुचली नाही.

न्या. महादेव गोविंद रानडे यांनी पुण्यातल्या वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यानातून ग्रँट डफच्या मराठ्यांच्या इतिहासाचे परीक्षण केले. ग्रँट डफच्या चुकांचा विशेष निर्देश न करता त्याच्या ग्रंथातील आक्षेपार्ह विधानांना तर्कशुद्ध उत्तरे देत न्यायमूर्तींनी मराठे हे काही ग्रँट डफ समजतोय तसे चोर लुटारू नव्हते, त्यांच्या हालचालीमागे काही विचार होते, काही परंपरा होत्या, काही निश्चित योजना होत्या हे स्पष्ट केले. ग्रँट डफने मराठ्यांच्या इतिहासाच्या विवेचनातून जो एक निष्कर्ष काढला होता की मराठी सत्तेचा उदय म्हणजे सह्याद्रीचा वणवा होय हा निष्कर्ष कसा चुकीचा आहे हे न्यायमूर्तींनी या व्याख्यानातून तर्कशुद्ध पद्धतीने मांडले. पुढे हाच विचार अधिक विस्ताराने प्रतिपादिणारा ग्रंथच न्या. रानड्यांनी लिहिला हे सर्वज्ञात आहेच.

इतिहासाचार्य राजवाड्यांनीदेखील ग्रँट डफच्या या ग्रंथावर बरीच टीका केली. त्यांच्या टीकेचा रोख दोन गोष्टीसंदर्भात होता. एक या ग्रंथातल्या त्रुटींवर त्यांचा रोख होता व या त्रुटींमुळे मराठ्यांचा हा इतिहास परिपूर्ण कसा ठरत नाही हे ते आवर्जून सांगताहेत. पानिपतच्या लढाई अगोदरच्या आठ दहा वर्षांतल्या घडामोडींशी सुसंगत अशी माहिती ग्रँट डफला मिळालेली दिसत नाही असे ते रास्तपणे म्हणतात. दुसरा टीकेचा मुद्दा आहेः ग्रंथातील मोहिमांच्या गोंधळाबद्दल. रघुनाथरावांच्या मोहिमांबद्दलचे ग्रँट डफचे अज्ञानही अनेक ठिकाणी दिसते असे ते म्हणतात. बखरीचा वापर पुरेपूर झाला नाही हे बरेच झाले असे लिहून राजवाडे यांनी बखरीचा अस्सलपणाच निकाली काढला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एखादे अस्सल चिठोरे सर्व बखरींना हाणून पाडू शकेल. तेव्हा अशा बखरीसारख्या दुय्यम साधनांवर आधारित हे लिखाण असल्याने राजवाडे यांना स्वाभाविकपणे हे रुचले नाही.

एकूण ग्रंथाच्या मांडणीसंदर्भातही राजवाडे असं म्हणतात की ग्रँट डफचा हा इतिहास म्हणजे इंग्रजांच्या इतिहासाच्या महासमुद्रात लुप्त झालेला मराठ्यांचा इतिहास आहे. सगळीकडे इंग्रजांच्याच हालचाली दिसतात. क्वचित कुठे तरी मराठ्यांचा उल्लेख यावा असा प्रकार आहे. एकूण ही मांडणी भारतीयांसाठी नसून इंग्रजांसाठी आहे. कालखंडाची पृष्ठनिहाय विभागणीदेखील असमान आहे असे सांगून राजवाड्यांनी ग्रँट डफच्या ग्रंथातील पृष्ठसंख्येची विभागणीच दिली आहे. ग्रँट डफच्या इतिहास विवेचनाला प्रारंभ होतो इ.स. १६४६ पासून. इ.स. १६४६ ते इ.स. १७९६ या प्रदीर्घ काळात कालखंडाची वाटचाल ४७५ पानांत रेखाटली गेलीय तर इ.स. १७९६ ते १८१८ या २२ वर्षांसाठी २०० पाने खर्ची पडलीत. या मांडणीत अधिक भर ब्रिटिश सत्तेचा उदय रेखाटण्यावर दिला जातोय हे स्पष्टच आहे. त्यामुळेच राजवाडे यांची टीका रास्त ठरते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी खरोखरच असे ही काही अभ्यासक होते की जे निखळ उत्सुकतेपोटी, जिज्ञासेपोटी, घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणे या उक्तीप्रमाणे एखाद्या क्षेत्रात स्वतःला झोकून देत. इतिहास संशोधनाला वाहिलेली अशी एक वेड्यांची फलटण या काळात महाराष्ट्रात उदयाला आली होती. वासुदेव वामनशास्त्री खरे ही त्यातलीच एक वल्ली. खरेशास्त्री यांच्या हाती ग्रँट डफचा ग्रंथ पडला. त्यांनी तो काळीपूर्वक वाचला. त्यातल्या चुकांची नोंद केली. नावांच्या चुका, तारखांच्या चुका, अशा एक एक करीत शंभर चुकांची यादी वासुदेव वामनशास्त्री खऱ्यांनी तयार केली. १९९५ साली भारत इतिहास संशोधन मंडळाच्या सभेत या चुकांवर नेमके बोट ठेवणारा लेख त्यांनी वाचला. एवढेच नव्हे तर भारत इतिहास संशोधन मंडळाने ग्रँट डफच्या पुस्तकातील चुकांची यादी करण्याचे काम हाती घेण्याचेही ठरवले होते.

**ग्रँड डफच्या लिखाणाचे महत्त्व -**

ग्रँट डफने लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासावर एवढी टीका टिप्पणी झाली, त्यातल्या चुका दाखवल्या गेल्या, म्हणजे हा ग्रंथ अगदीच कुचकामी होता असे मानायचे का? निश्चितच तसे मानायचे नाही. ग्रंथाचे महत्त्व त्यातील चुकांमुळे कमी झालेले नाही. उपलब्ध कागदपत्रांच्या चुकीच्या नोंदीमुळे, मुद्रणदोषांमुळे चुका होऊ शकतात. पुढील आवृत्तीतून त्या सुधारल्याही गेल्या. ग्रंथातील त्रुटी ही प्रामुख्याने आवश्यक ती माहिती कागदपत्रे, साधने उपलब्ध न झाल्यामुळे निर्माण झालेली होती. ही त्रुटी लक्षात आली म्हणून मराठी कागदपत्रांचा धांडोळा सुरू झाला. इंग्रजी सत्तेच्या उदयाचा आलेख रेखाटताना किंवा मुघलांचा इतिहास सांगताना नोंदवलेला मराठ्यांचा इतिहास प्रत्यक्षात एक प्रचंड सामर्थ्य होते याची जाण हळूहळू निर्माण होत गेली ती या ग्रंथामुळे. मराठ्यांच्या इतिहासाचा शोध घेतला गेला. साधनांची जमवाजमव सुरू झाली. दफ्तरखाने, संशोधनमंडळे, पुराभिलेखसंग्रह निर्माण झाले. पुराभिलेखीय अभ्यासाचे नवे दालन खुले झाले. ग्रँट डफच्या मराठ्यांच्या इतिहासाने हे सारे घडवून आणले. त्या विषयावरील पहिला ग्रंथ म्हणून इतिहासाचे एक नवे दालन खुले करण्याचा मान निश्चितच ग्रँट डफच्या या ग्रंथाला दिला पाहिजे.

## सर जदुनाथ सरकार

पाश्चात्त्य ज्ञानाच्या प्रभावाने भारावलेली अशी एक पहिली पिढी महाराष्ट्रात उदयाला आली आणि या पिढीनेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले अनेक विचारवंत आणि राजकारणी नेते तसेच इतिहासकार निर्माण केले. असाच काहीसा प्रकार बंगालमध्येही घडला. तेथेही पाश्चात्त्य ज्ञानाने भारावलेले तरुण नवविचाराचे लोण पसरवत होते. बुद्धिनिष्ठा, विवेकवाद, समता आणि स्वातंत्र्याचा विचार मांडत होते. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून शिकून बाहेर पडलेले तरुण सनातनी रूढिप्रिय बंगाली समाजात सुधारणांचा आग्रह धरू लागले. जमीनदार घराण्यातील अनेक लोकही नवविचारांनी भारावले. अशाच एका जमीनदार घराण्यात जदुनाथ सरकारांचा जन्म झाला.

**जन्म आणि बालपण -**

बंगालमधील करचमरिया गावातील राजकुमार सरकार या जमीनदाराच्या पोटी १० डिसेंबर १८७० या दिवशी जदुनाथ सरकारांचा जन्म झाला. सरकारं घराणे तसे जमीनदाराचे असले तरी बरेचसे सुधारणावादी विचारांचे होते. घरात पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव होता. निरनिराळ्या क्षेत्रात रुची असलेली मंडळी घरात होती. कलेची आवड होती. अशा वातावरणात जदुनाथांचे बालपण गेले. इंग्रजीचा व्यासंग असलेल्या राजकुमार सरकारांमुळे जदुनाथांवरही इंग्रजी वाङ्मयाचे संस्कार झाले. वाचनाची आवड लागली. जदुनाथ लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धीचा हुशार मुलगा होता. राजेशाहीत त्याचे प्राथमिक शिक्षण झाले. १८८७ साली त्याने एन्ट्रन्सची परीक्षा पास केली. महाविद्यालयीन शिक्षणासाठी जदुनाथ सरकार कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात दाखल झाले. अभ्यासाबरोबरच खेळाचे आणि विशेषतः फुटबॉलचे त्यांना आकर्षण होते. फुटबॉल टीमचे ते कॅप्टन होते. हॉस्टेल जीवनातच एक उमदा खेळाडू आणि हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती झाली.

**प्रेसिडेन्सी कॉलेजातील शिक्षण -**

१८९१ साली जदुनाथ सरकार प्रेसिडेन्सी कॉलेजातून बी. ए. झाले. महाविद्यालयीन शिक्षणात इंग्रजी आणि इतिहास हे त्यांचे ऐच्छिक विषय होते. त्यांना दोन्ही विषयांची आवड होती. पुढे त्यांनी इंग्रजीत एम. ए. केले. १८९२-९३ साली ते एम. ए. झाले आणि रीपन कॉलेजात इंग्रजीचे लेक्चरर बनले. पाच सहा वर्षानंतर कलकत्त्याच्या विद्यासागर कॉलेजात ते असि. प्रोफेसर पदावर रूजू झाले. १८९८ साली ते प्रांतीय शिक्षण सेवेत गेले आणि त्यांची नेमणूक प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रोफेसर म्हणून झाली. काही वर्षांतच त्यांची पाटण्याला बदली झाली. १९१७ पर्यंत ते पाटणा कॉलेजात इंग्रजी विभागात प्राध्यापक होते. दरम्यान त्यांनी इतिहासाचा व्यासंग वाढवला. इतिहासातही एम.ए. पदवी मिळवली. इतिहासाचेही अध्यापन ते करू लागले. याच काळात त्यांच्यातला इतिहासाचा लेखक आणि संशोधक जागृत झाला. इंग्रजीपेक्षा त्यांना इतिहासात अधिक रस वाटू लागला. १९१७ साली त्यांनी इंग्रजीचे अध्यापन क्षेत्रही सोडले आणि बनारस हिंदू विद्यापीठाच्या इतिहास विभागात ते रूजू झाले. सात आठ वर्षानंतर ते परत पाटण्याला आले आणि पाटण्यातूनच १९२६ साली निवृत्त झाले. मुळात बंगाली असलेले जदुनाथ सरकार अनेक वर्षे नोकरीनिमित्त बिहारमध्ये पाटण्यातच राहिले.

**कलकत्ता विद्यापीठाचे व्हाईस चॅन्सलर -**

इतिहास संशोधकांपैकी फारच थोड्या लोकांना व्हाईस चॅन्सलरपदी नेमणूक मिळाली त्यातले एक जदुनाथ सरकार होत. १९२६ ला त्यांची कलकत्ता विद्यापीठाच्या व्हाईस चॅन्सलरपदी नेमणूक झाली. एक ख्यातनाम प्राध्यापक म्हणून जदुनाथांचा दबदबा होता. त्याकाळी व्हाईस चॅन्सलरपदी नेमणूक होणे सोपी गोष्ट नव्हती. तीन वर्षांच्या त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठाची भरभराट झाली. त्यांना दुसरी टर्म मिळाली. दुसऱ्यांदा त्यांची व्हाईस चॅन्सलरपदी नेमणूक झाली, पण त्यांनी ती नाकारली. याच काळात त्यांना 'सर' हा बहुमानाचा किताब बहाल करण्यात आला. त्याचबरोबर १९२६ ला त्यांना 'CIE' हा किताबही मिळाला. 'CIE' चा विस्तार (Companian of Indian Empire) असा आहे. ब्रिटिश सरकारचा सन्माननीय मित्र या अर्थाचा हा किताब होय.

**जदुनाथ सरकारांना मिळालेले बहुमान -**

इतिहास संशोधन क्षेत्रात कार्य करणाऱ्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे सभासदत्व मिळणे हादेखील त्या काळी बहुमान मानला जायचा. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ लंडनचे सभासदत्व जदुनाथ सरकारांना १९२३ साली मिळाले. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ आयर्लंडचेही ते सभासद झाले. हे सभासदत्व सन्मानदर्शक असे. मुंबई आणि कलकत्त्यातही रॉयल एशियाटिक सोसायटीच्या शाखा होत्या. त्या शाखांशीही सरकारांचा संबंध होता. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बेने त्यांना कॅम्पबेल गोल्ड मेडल बहाल केले. १९३५ साली रॉयल हिस्टॉरिकल सोसायटीने त्यांना सभासदत्व दिले. अमेरिकन हिस्टॉरिकल सोसायटीचेही ते सभासद होते. या सर्व सन्मानदर्शक सभासदत्वाशिवाय ढाका आणि पाटणा विद्यापीठांनी 'D.LIT' ही सन्मानदर्शक पदवीही त्यांना दिली होती.

**जदुनाथांचे इतिहास चिंतन -**

मुळात इंग्रजीचे प्राध्यापक असलेले जदुनाथ सरकार इतिहास विषयाच्याही चिंतनात मग्न असत. १९१७ पासून तर त्यांनी इतिहासाचे अध्यापनही सुरू केले. जदुनाथ सरकारांचे इतिहास चिंतन मुख्यतः मध्ययुगीन इतिहासासंबंधी होते. मध्ययुगातील मुघल-मराठा काळावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले होते. जदुनाथ सरकारांचा तसा भाषांचाही व्यासंग दांडगा होता. इंग्रजी, हिंदी भाषांबरोबरच फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, पर्शियन या भाषांचाही त्यांचा अभ्यास होता. या सर्व भाषा त्यांना अवगत होत्या. संस्कृतही त्यांना येत होती. साहजिकच या निरनिराळ्या भाषांतील हस्तलिखित कागदपत्रांचा शोध घेत त्यांनी मुघलांच्या इतिहासाचा माग काढला. दिल्लीतल्या दफ्तरखान्यात जशी कागदपत्रे होती तशीच पोर्तुगीजांनी, इंग्रजांनी, फ्रेंचांनी, जर्मनांनीदेखील अनेक हस्तलिखित ग्रंथ मिळवून त्यांचा संग्रह स्वतःच्या मायदेशी केला होता. कंपनीच्या कारभारातून ही असंख्य कागदपत्रे उपलब्ध होत होती. इतिहासाचा संशोधक या नात्याने जदुनाथ सरकारांनी या सर्व कागदपत्रांचा अभ्यास सुरू केला होता. मुघलांच्या इतिहासाची अव्वल दर्जाची साधने पर्शियन भाषेतून उपलब्ध होती ती त्यांनी काळजीपूर्वक हाताळली होती, अभ्यासली होती.

दिल्लीच्या पुराभिलेखागारातील कागदपत्रांचा अभ्यास मुघलांच्या इतिहास लेखनाला प्रेरक ठरला. अशीच दुर्मिळ हस्तलिखिते लाहोर, हैदराबाद, पाटणा व रामपूर येथेही होती. तीही सरकारांनी अभ्यासली. या अभ्यासातून त्यांचे इतिहास-लेखन मूर्त स्वरूपात आले. प्रत्यक्षात निवृत्तीनंतरच्या काळातच त्यांनी इतिहास लेखनाला सुरुवात केली. मोगलांच्या काळाविषयी विशेषतः औरंगजेबाविषयी, मोगलांच्या प्रशासन व्यवस्थेविषयी बंगालच्या नवाबाविषयी आणि मराठ्यांच्या आनुषंगिक इतिहासाविषयी जदुनाथ सरकारांचे चिंतन, मनन त्याअगोदर अनेक वर्षे चालू होते.

**इतिहास लेखन** -

जदुनाथ सरकारांचा इतिहास लेखनाचा व्यासंग इतका दांडगा होता की जवळपास २७ ग्रंथ त्यांनी लिहिले. एवढे विस्तृत लिखाण प्रकाशित होण्याचा मान स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहासकारांना फार क्वचितच मिळाला. अशा असामान्य इतिहास लेखकांमध्ये जदुनाथ सरकारांचा समावेश होतो. मुघलकालीन इतिहासाचे विविध पैलू जदुनाथांनी आपल्या ग्रंथ लेखनातून प्रकाशात आणले. औरंगजेबकालीन भारत, त्या काळातील रस्ते, एकूण भूस्तररचना आणि इतर सांख्यिकी माहिती देणारा ग्रंथ जदुनाथांनी लिहिला. सर्व पर्शियन कागदपत्रांचा बारकाव्याने अभ्यास करून औरंगजेबाचे अत्यंत सविस्तर असे चरित्र ५ खंडांत त्यांनी लिहिले. सरकारांचा हा औरंगजेबावरचा ग्रंथ वाचल्याशिवाय पुढे जाताच येत नाही असे महत्त्वपूर्ण लिखाण या ग्रंथातून प्रकाशित झाले आहे. तसेच मोगल प्रशासनाची सारी वैशिष्ट्ये, सारे बारकावे, पूर्ण तपशील अगदी अस्सल कागदपत्रांच्या आधारे नोंदवणारा हा एक प्रचंड ग्रंथराज सरकारांनी लिहिला. तीन खंडांत हा मोगल प्रशासनावरचा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू होतो आणि मोगलांच्या हासाला प्रारंभ होतो. औरंगजेबानंतरच्या मोगल राजांची माहिती देणारा ग्रंथ खरे तर आर्यविन या इंग्रज अभ्यासकाने लिहायला घेतला होता. त्याचे अर्धवट राहिलेले लिखाण जदुनाथ सरकारांनी पूर्ण केले आणि लॅटर मुघल्स हा ग्रंथ प्रकाशित केला. मोगल साम्राज्याच्या हासाची कारणमीमांसा करणारा 'फॉल ऑफ दि मोगल एम्पायर हा ग्रंथही खूप गाजला. याशिवाय आईन-ए-अकबरी, मासिर-ए- आलमगीरी यांसारखी हस्तलिखिते त्यांनी प्रकाशित करून त्यांची इंग्रजी भाषांतरेही केली. औरंगजेबासंबंधीच्या आख्यायिका आणि इतर निबंधांवरचे एक पुस्तकही जदुनाथांनी प्रकाशित केले होते. औरंगजेबाच्या कारकिर्दीविषयीचा अभ्यासही ग्रंथरूपाने त्यांनी शब्दबद्ध केला. सांगण्याचा मथितार्थ असा की जदुनाथ सरकाराच्या इतिहास लेखनात मोगल इतिहास लेखनाला विशेष महत्त्व होते. मोगल इतिहासाची नोंद करणारे इतिहासकार म्हणूनच जदुनाथ सरकार ख्यातकीर्त झाले.

**मराठ्यांच्या इतिहासावरील लेखन** -

मोगल काळावर लिखाण करण्याच्या उद्देशाने जदुनाथांचे लिखाण झाले असले तरी मुघलांच्या नाण्याची दुसरी बाजू मराठे होते. मराठी सत्तेच्या राजकारणाचा विचार केल्याशिवाय मोगलांच्या इतिहासाला परिपूर्णता येऊ शकत नाही. जदुनाथांनी मोगलांवर जसे ग्रंथलेखन केले तसेच मराठ्यांच्या इतिहासावरही त्यांनी लिहिले. 'शिवाजी अँड हिज टाईम्स' हा त्यांचा गाजलेला ग्रंथ. पर्शियन साधनांच्या आधारे मुख्यतः जदुनाथांनी शिवाजी आणि शिवकाळाचे समालोचन वरील ग्रंथात केले आहे. १९१९ साली हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथातील त्यांचे निष्कर्ष बरेच एकांगी आणि मराठी साधनांकडे दुर्लक्ष करणारे होते. जदुनाथ सरकारांच्या या ग्रंथामुळे पर्शियन साधनांवर आधारित शिवचरित्र पुढे आले. जदुनाथ मुघल प्रशासन व्यवस्थेने एवढे भारावले होते की त्या तुलनेत त्यांना मराठी प्रशासन व्यवस्थेचे महत्त्व जाणवलेच नाही. शिवाजीने स्थिर अशी प्रशासन व्यवस्था व इतरही संस्था निर्माणच केल्या नाहीत हा निष्कर्ष त्यांनी त्यावरून काढला होता. कालांतराने त्यांचा हा निष्कर्ष चुकीचा होता हे स्पष्ट झाले. असंख्य मराठी कागदपत्रे प्रकाशात आली आणि मराठी राज्याच्या प्रशासनाचे बारकावेही स्पष्ट होत गेले. त्यांचा 'हाऊस ऑफ शिवाजी' हा ग्रंथही गाजला.

**इतर ग्रंथलेखन** -

मोगल आणि मराठा कालखंडाशिवाय जदुनाथ सरकारांनी पूना रेसिडेन्सी करस्पॉडन्सवर लिखाण केले. ब्रिटिशकालीन भारताचा आर्थिक इतिहास रेखाटला. मोगलांच्या अखेरच्या काळातील बिहार आणि ओरिसातील परिस्थितीचे

समालोचन करणारा ग्रंथही त्यांनी लिहिला. भारताच्या समग्र इतिहासाची वाटचालही 'इंडिया थ्रू एजेस' या ग्रंथातून रेखाटली. भारताचा लष्करी इतिहास लिहिला. दसनामी पंथाची वाटचाल रेखाटणारे दोन खंडही त्यांनी प्रकाशित केले. महादजी शिंद्यांवर आणि बंगालच्या नवाबावरचे त्यांचे लिखाणही उल्लेखनीय ठरते. चैतन्य महाप्रभूवरील त्यांचा ग्रंथ चैतन्यांच्या शिकवणुकीचे सोपपत्तीकरण करणारा ग्रंथ होय. या ग्रंथ-लेखनाशिवाय जदुनाथ सरकारांनी केंब्रीज हिस्टरी व्हॉल्यूम्ससाठीही काही लिखाण केले होते. हे लिखाण मुघल मराठा कालखंडासंबंधात होते.

**इंडियन हिस्टॉरिकल रिकार्ड कमिशनवरील कार्य -**

इंडियन हिस्टॉरिकल रिकाड्र्स कमिशनच्या कार्यात जदुनाथांचा सक्रिय सहभाग होता. रिकार्ड कमिशनच्या प्रोसिडिंग्जमध्येही अत्यंत दर्जेदार असे शोधनिबंध सादर केले जात असत. हिस्टॉरिकल रिकॉड्र्सचे विश्लेषण केले जाई. जदुनाथ सरकारांनी अशा काही दस्तावेजांवर शोधनिबंध लिहिले आहेत. त्याशिवाय 'हिंदुस्थान स्टैंडर्ड' सारख्या काही साप्ताहिकांतूनही ते सतत लिहीत असत. भारतीय पुराभिलेखांच्या आणि ऐतिहासिक दस्तावेज संग्रहसंरक्षण, विश्लेषण आणि संशोधनाच्या कार्यातील त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे होते. इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये -

इतिहास हे शास्त्र आहे हे जरी काही अंशी खरे असले तरी अभिव्यक्तीच्या पातळीवर ती कलाही आहे. म्हणूनच व्यक्तिगत इतिहास लेखकाची वैशिष्ट्ये घेऊन इतिहास लेखनाच्या पातळीवर इतिहास साकारतो. वस्तुनिष्ठ इतिहास लेखनाचा आग्रह धरणारे इतिहासकारही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पूर्णपणे टाळू शकत नाहीत. हा प्रभाव इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये घेऊन साकारतो. तसे पाहता या वैशिष्ट्यांमुळे वस्तुनिष्ठतेला बाध येत नाही तर वस्तुनिष्ठतेचा निकष समजून घ्यायला उलट मदतच होते. जदुनाथ सरकार हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले इंग्रजी शिक्षणाने भारावलेल्या पिढीचे प्रतिनिधी, लॉर्ड मेकालेंच्या विचारांचा प्रभाव घेऊन पाश्चात्त्य ज्ञानाकडे वळलेले तरुण अभ्यासक, गिब्बन, लेकी, कार्लाईल यांच्या इतिहास लेखनाचा प्रभाव त्यांच्यावर निश्चितपणे होता. रॅन्केने इतिहासाला जे एक वेगळे स्थान प्राप्त करून दिले त्याच दिशेने जदुनाथ सरकारांचीही वाटचालू चालू राहिली. साधनांशिवाय इतिहास नाही ही भूमिका घेऊन जदुनाथ सरकारांनी मध्ययुगीन इतिहासाची पुराभिलेखीय साधने दफ्तरखान्यातून धुंडाळली. त्या आधारे मुघलांचा इतिहास रेखाटला. इतिहासाची साधने म्हणून मोगलकालीन कागदपत्रांचे विश्लेषण करीत सरकारांनी औरंगजेबाचा इतिहास रेखाटला (१) पुराव्यांच्या आधारे वस्तुनिष्ठपणे गतकाळाचे विवेचन हे सरकारांच्या इतिहासाचे एक वैशिष्ट्य होते. (२) दंतकथांनाही पूर्णपणे काल्पनिक न मानता त्यांचा आधार घंडाळून, त्यातून अन्वयार्थ शोधीत त्यांनी मोगलकालीन लोककथांचा शोध घेतला. नेबूर या समाजशास्त्राज्ञाच्या दंतकथांच्या विश्लेषणाचे सूत्र त्यांनी स्वीकारले आणि अनॅकडॉट्स अर्थ लावला. त्यांच्या लिखाणाचे हे आणखी एक वैशिष्ट्य.

इतिहास लेखनात भूगोलाचा, भूस्तरपटलांचा विचार करून औरंगजेबाच्या हालचालींची नोंद करणारे इतिहासकार म्हणून जदुनाथ सरकारांचा उल्लेख होतो. (३) भौगोलिक परिस्थितीचे परिशीलन करीत करीत केलेले मुघलांचे इतिहास लेखन हे त्यांच्या इतिहास लेखनाचे वैशिष्ट्य मानले जाते. (४) १९ व्या शतकात मराठ्यांच्या इतिहासावर लिहिणारे इतर इतिहासकार ज्या पर्शियन साधनापर्यंत पोहोचले नव्हते अशी पर्शियन साधने जदुनाथ सरकारांनी वापरली. शेवटी खाफीखानासारखा समकालीन पर्शियन इतिहासकार हा पूर्णतः मुघलांच्या बाबतीत सहानुभूती बाळगणारा तवारीखकार होता. वस्तुनिष्ठतेची कल्पनाच त्या काळातल्या लेखनात नव्हती. तरीही पर्शियन लिखाणातून बरीचशी नवी माहिती मिळाल्याने. तिचा वापर जदुनाथांनी प्रथमच केला. पर्शियन साधनांवर आधारित मराठ्यांच्या इतिहासावर त्यांनी लिहिले. हे त्यांच्या लिखाणाचे आणखी एक वैशिष्ट्य ठरावे. (५) पर्शियन साधनांबरोबरच मराठी साधने ही जर योग्यरीत्या वापरली गेली असती तर अफझलखान प्रसंगाचे सदोष चित्रण झाले ते जदुनाथ सरकारांच्या लिखाणात झाले नसते. खाफीखान आणि इतर पर्शियन तवारिखकार, तसेच पर्शियन कागदपत्रे शिवाजी महाराजांचा उल्लेख 'शिवा' असा एकेरी करतात. औरंगजेबाचा उल्लेख मात्र आलमगीर पातशहा असा होतो. पर्शियन कागदपत्रांतून ते स्वाभाविकही आहे पण त्याच वेळी मराठी कागदपत्रे शिवाजीच्या वेगळ्याच प्रभावी अशा व्यक्तिमत्त्वाचा शोध घेत असतात. ती लक्षात न घेतल्याने वस्तुनिष्ठतेची भूमिका घेऊनही लिखाणाला बाधा येईल

असा प्रकार घडतो. जदुनाथ सरकारांच्या शिवचरित्र रेखाटनात असा बाध आलेला आहे म्हणूनच अफझलखानाच्या भेटीच्या प्रसंगी सरकार शिवाजीवर दोषारोप ठेवतात. (६) मराठ्यांच्या राजकारणाच्या दिशेचा योग्य तो परामर्श न घेणे जदुनाथांच्या लेखनातून घडले आहे. त्यावर टीकाही झाली आहे. जिझीया करासंबंधीचे सरकारांचे विवेचन असेच सदोष आहे. महाराष्ट्राबाहेर मराठ्यांनी केलेली मुलुखगिरी व त्यातून झालेले अत्याचार जदुनाथ सरकारांनी विस्ताराने मांडले. पर्शियन कागदपत्रांतून असलेली अतिशयोक्त वर्णने त्यांनी ग्राह्य धरली. त्यामुळे मराठ्यांविषयी पूर्वग्रह बाळगून झालेले लिखाण अशी एक प्रतिमा जदुनाथांच्या लिखाणाविषयी झालेली आहे. सरकारांचे इतिहासाचे तत्त्वज्ञान - सर जदुनाथ सरकार काही इतिहासाचे विशिष्ट तत्त्वज्ञान प्रतिपादन करणारे तत्त्ववेत्ते नव्हते. परंतु तरीही इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची एक दृष्टी त्यांच्या लिखाणातून दिसते. इतिहासातील शास्त्रशुद्ध दृष्टिकोन बाळगून सत्य शोधण्याचा प्रयत्न ते करतात. सत्य कितीही कठोर असले तरी त्याला इतिहासकाराने सामोरे गेले पाहिजे ही भूमिका घेऊन ते इतिहासाचा धांडोळा घेतात. दुसरी गोष्ट म्हणजे इतिहास घडत असताना 'स्थल' हा घटक सरकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. ज्या परिसरात घटना घडतेय तो परिसर, त्याचा भूगोल, टोपोग्राफी यांचा एक अपरिहार्य परिणाम घटनेवर असतो. स्थल आणि घटना या एकमेकांत एकरूप झालेल्या असतात असे त्यांना वाटते. म्हणूनच इतिहास लेखनात त्यांनी टोपोग्राफीला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

इतिहासतल्या प्रत्येक घटनेमागची कार्यकारणपरंपरा सांगता येत्त असली तरी अनेकदा अतर्क्स अशा गोष्टी घडलेल्या असतात. कित्येक गोष्टींची कारणपरंपरा सांगता येत नाही. अशावेळी अगदी बुद्धिवादी शास्त्रशुद्ध इतिहासवेत्तादेखील दैववादाचा सिद्धांत प्रतिपादन करतो आणि मानवी जीवनात अशी एक सुप्त शक्ती असते जिला तुम्ही नाव काहीही द्या ती खरे तर घटना घडवीत असते असे मानतो. जदुनाथ सरकारही मध्ययुगीन इतिहास लेखनात ही भूमिका घेताना आढळतात. काही ठिकाणी ते दैवी न्याय असल्याचे म्हणतात, त्यामागे हेच तत्त्वचिंतन असते. आग्रा येथून शिवाजीची सुटका झाल्याचा प्रसंग वर्णन करताना ते असं लिहून जातात की विश्वासघातकी जुलुमशाहीच्या पंजातून सुटका करून घेण्यासाठी शिवाजीला दैवानेच मदत केली. या त्यांच्या वाक्यातून सरकारांचा दैववादावरील विश्वास व्यक्त होतो. दैववादाचेचच दुसरे रूप म्हणजे अपरिहार्यतेचा विचार होय. गतकालीन ऐतिहासिक घटनाक्रमातही सगळ्या गोष्टींचे स्पष्टीकरण आपल्याला देता येईलच असे नसते. काही गोष्टी अपरिहार्य असतात, अटळ असतात. त्या ज्यावेळी घडायच्या त्यावेळी घडतातच. अतिशय खंबीर असे मानवी प्रयत्नही कालगतीपुढे निष्प्रभ होतात. अशा वेळी दैव आणि अपरिहार्यताच घटनाक्रमाला त्याच्या नियत फलाकडे नेत असते. औरंगजेबाच्या पतनाचा विचार मांडताना जदुनाथ सरकारांनी अपरिहार्यतेचा उल्लेख केला आहे. घटनांचे वर्णन करताना येणारी ही पूरक विधाने इतिहासकाराचे तत्त्वचिंतन, त्याची इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी स्पष्ट करीत असते.

श्री. रा. टिकेकरांनी मोठ्या नेमक्या शब्दांत जदुनाथ सरकारांच्या इतिहास लेखनाचे तत्त्वज्ञान सांगितले. जदुनाथांचे इतिहास लेखन म्हणजे घटना ज्या भागात घडली त्या भागाचा कारटोग्राफ, रेखांकन, स्थळांची नेमकी ओळख, घटनेच्या संदर्भातले काळाचे संदर्भ आणि या सर्व घटकांचा योग्य समन्वय, कोरॅबोरेशन होय. या विधानातूनच त्यांची संशोधन पद्धती स्पष्ट होते.

## डॉ. सुरेन्द्रनाथ सेन (१८९०-१९६२)

मराठ्यांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक म्हणून बंगाली इतिहासकारांमध्ये डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी विविध कारणांसाठी मानाचे स्थान पटकावले आहे. डॉ. सेन हे पहिले इतिहासकार आहेत की ज्यांनी मराठ्यांच्या इतिहासातील आत्तापर्यंत दुर्लक्षित झालेल्या विषयांचा अभ्यास केला. हे विषय म्हणजे 'प्रशासनाचा इतिहास' आणि 'लष्करी इतिहास." मराठ्यांच्या इतिहासात मराठी भाषेने जी सेवा केली आहे त्याचा प्रभाव डॉ. सेन जाणून होते. त्यामुळेच त्यांनी मराठ्यांची मराठी भाषा प्रयत्नपूर्वक शिकून घेतली. परंपरागत देशभक्त इतिहासकारांचा कित्ता गिरविणाऱ्यांपैकी हे एक, प्रमुख इतिहासकार होते. म्हणूनच एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला ज्या मराठ्यांची सत्ता ब्रिटिशांनी बळकावली, त्यांचा सखोल अभ्यास करण्यास डॉ. सेन यांनी सुरुवात केली. बंगालमधील देशभक्त इतिहासकार विशेषतः मराठ्यांचे

इतिहासकार मेजर बी. डी. बसू यांच्या 'स्टोरी ऑफ सातारा' (१९२२) या पुस्तकात १८४८ मध्ये ब्रिटिशांनी सातारा राज्य खालसा केले, त्याबद्दल ब्रिटिशांच्या धोरणाविरुद्ध निषेध व्यक्त केला होता.

सर आशुतोष मुखर्जी यांना मराठ्यांच्या इतिहासावरील निवडक उपयुक्त कागदपत्रे पुस्तकरूपात छापायची होती, आणि मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या अमराठी विद्यार्थ्यांसाठी त्या कागदपत्रांचे इंग्रजीत भाषांतर करून हवे होते. सर आशुतोष मुखर्जी यांच्या आदेशानुसार डॉ. सेन मराठा इतिहासाच्या क्षेत्रात उतरले. सर आशुतोष मुखर्जीच्या योजनेला मूर्त रूप देण्यासाठी डॉ. सेन कामाला लागले. सुरुवातीला त्यांनी सतराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात शिवाजी राजांचा समकालीन कृष्णाजी अनंत सभासद याने लिहिलेल्या मराठी बखरीचे भाषांतर करण्यास सुरुवात केली. या बखरीत शिवाजी राजांच्या कारकीर्दीच्या संपूर्ण इतिहासाचे वर्णन आहे. बहुतेक इतिहासकार या बखरीला विश्वासार्ह मानतात. तसेच सभासद हा शिवाजीराजांचा समकालीन होता, हाही एक महत्त्वाचा भाग आहे. या बखरीशिवाय डॉ. सेन यांनी 'शिवादिग्विजय' आणि 'चिटणीस बखर' या दोन्हींमधील काही भागांचे भाषांतर केले आणि या तीनही साधनांचा मिळून 'शिवछत्रपती' असा एक ग्रंथ तयार केला. या भाषांतरांबरोबर या ग्रंथात डॉ. सेन यांनी स्वतःच्या अभ्यासातून तीन टीपा आणि पुरवण्यांचाही समावेश केला आहे. यावरून डॉ. सेन यांची मराठ्यांच्या इतिहासाबद्दलची विशेष आवड दिसून येते.

डॉ. सेन यांनी 'दि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टीम ऑफ दि मराठाज्' नावाचा अमूल्य ग्रंथ (१९२३) लिहिला. हा ग्रंथ नव्याने मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांना वाट दाखवणारा ठरला. डॉ. सेन यांनी हा ग्रंथ लिहिण्यासाठी किती परिश्रम घेतले होते, याची कल्पना ग्रंथाची प्रस्तावना वाचताना येते. यांत मराठ्यांची सत्ता या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरली होती, याचा थोडक्यात परामर्ष घेतलेला आहे. त्यात ते म्हणतात, भारताचे हे शेवटचे हिंदुसाम्राज्य, अनेक घटना, प्रसंगांनी भरलेले असून १७० वर्षांनंतर ते काळाच्या पडद्याआड गेले.

हे विस्तीर्ण साम्राज्य लुटारू आणि दरोडेखोरांनी भरलेले होते आणि येथील मराठे सरदार, लुटारू, दरोडेखोर, अनीतिमान होते, असा सर्वसामान्य माणसांचा झालेला समज पाहून डॉ. सेन चक्रावून गेले. कारण लुटालूट आणि दरोडेखोरी एवढ्याच गोष्टी असलेले साम्राज्य दीडशे वर्षांहून अधिक काळ अस्तित्वात राहू शकते, ही बाब आश्चर्य करण्यासारखीच होती. न्यायमूर्ती म. गो. रानडे यांनी त्यांच्या 'राईज ऑफ दि मराठा पॉवर' या सर्वोत्तम ग्रंथात, हाच प्रश्न उपस्थित केला आहे आणि या बिनबुडाच्या आरोपांमध्ये काहीही तथ्य नसून, मराठे लोक कसे निर्दोष होते, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. सेन यांनीही वरील गैरसमजांचे खंडन करण्यासाठी मराठ्यांच्या मुलकी आणि लष्करी प्रशासन व्यवस्थेचे उदाहरण दिले आहे. कारण या दोन भक्कम आधारांवरच मराठ्यांचे राज्य एवढे दीर्घकाळ टिकू शकले होते. डॉ. सेन लिहितात, "मराठे केवळ लुटारू आणि दरोडेखोर नव्हते. त्यांच्यासंबंधीच्या मूळ कागदपत्रांवरून मला असे लक्षात आले आहे की, मराठ्यांकडे त्यांच्या साम्राज्याचा कारभार चालवण्यासाठी योग्य त्या नीतिनियमांची, कायद्यांची उत्तम जोड होती. अधिक संशोधन केल्यावर माझी खात्री पटली आहे की, सुरळीत राज्यकारभारासाठी लागू केलेले नीतिनियम हे मराठ्यांनी स्वतः तयार केले नव्हते, तर हिंदू आणि या प्रदेशाच्या माजी अंमलदारांकडून ते वारसाहक्काने त्यांच्याकडे आलेले होते. म्हणूनच मराठ्यांची शासकीय व्यवस्था ही श्रेष्ठ आहे". ते पुढे असेही दाखवून देतात की, सध्याच्या ब्रिटिश भारतीय प्रशासकीय व्यवस्थेवर मराठ्यांच्या व्यवस्थेचा काही प्रमाणात प्रभाव आहे. कारण त्या व्यवस्था प्राचीन हिंदू आणि मुसलमानी व्यवस्थांवर बेतलेल्या होत्या.

पेशव्यांकडून जो मुलूख ब्रिटिशांनी जिंकलेला होता त्याच मुलखाचा माउंटस्टुअर्ट एलफिन्स्टन प्रमुख होता. त्याचे मराठ्यांच्या सध्या अस्तित्वात असलेल्या मुलकी व्यवस्थेबद्दल चांगले मत होते. त्यामुळे त्याने परकीय किंवा नव्या आधुनिक कल्पना राबविण्याचे टाळले. एलफिन्स्टन हा साम्राज्यशाहीचा पुरस्कार करणारा आणि त्याचबरोबर उदारमतवादी विचारसरणी यांचा समन्वय साधणारा प्रशासक होता. नव्याने विजय मिळविलेल्या मराठ्यांच्या मुलखावर, नवे कायदे लागू करण्याचे टाळले तरच आपल्या जडणघडणीच्या काळात ब्रिटिश राज्यसत्ता चांगली प्रगती करू शकेल,

असा एलफिन्स्टनने विचार केला आणि त्यानुसार मराठ्यांना ज्या कायदेपद्धतीने चांगले जीवन जगता येत होते, जी कायदेपद्धती मराठ्यांना अनुकूल ठरली होती, तीच मराठा पद्धत जास्तीत प्रमाणात जास्त चालू ठेवण्याचा त्याने प्रयत्न केला. एलफिन्स्टनचा समकालीन सर थॉमस मन्रो यानेही त्याला दुजोरा दिला.

डॉ. सेन यांनी पाच वर्षांहून जास्त काळ मराठ्यांच्या मुलकी व्यवस्थेचा सखोल अभ्यास केला आणि त्यावरून काढलेले निष्कर्ष १९२३ मध्ये प्रसिद्ध केले आणि मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधनकार्य सुरू ठेवले. सुरुवातीला त्यांना सेनापती शिवाजी राजाच्या व्यक्तिमत्त्वाचे फार आकर्षण वाटत होते. अर्थात त्याला एक कारणही घडले. ते म्हणजे रमेशचंद्र दत्त यांची 'महाराष्ट्र जीवन प्रभात' ही कादंबरी डॉ. सेन यांच्या वाचनात आली. बहुधा या कादंबरीच्या प्रभावाने, डॉ. सेन यांनी मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थेचे संशोधन करण्याचे काम हाती घेतले.

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे डॉ. सेन यांनी 'शिवछत्रपती' हा ग्रंथ लिहिला तेव्हा त्यांना मराठी साधनांची चांगली माहिती झाली होती. त्याचबरोबर मराठ्यांच्या मुलकी व्यवस्थेचा अभ्यास करतानाही त्यांनी मराठी कागदपत्रांचे बारकाईने विश्लेषण केले होते. मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थेवर लिहिलेल्या 'मिलिटरी सिस्टीम ऑफ दि मराठाज्' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते लिहितात, "मराठ्यांच्या साम्राज्याचा जेवढा वेगाने विस्तार झाला तेवढ्याच वेगाने त्याचा हासही झाला. यामागची कारणे शोधण्यासाठी मी गेल्या दहा वर्षांपासून मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थेचा अभ्यास सुरू केला. सुरुवातीला मराठ्यांचे साम्राज्य हे लष्करी साम्राज्य होते आणि त्यांच्या प्रशासनाचा लष्करी व्यवस्थेशी अगदी जवळचा संबंध होता." ही खात्री पटल्यानंतर डॉ. सेन यांनी लष्करी व्यवस्थेच्या संशोधनाचे काम हाती घेतले. 'दि मिलिटरी सिस्टीम ऑफ दि मराठाज्' हा डॉ. सेन यांचा ग्रंथ १९२८ मध्ये प्रकाशित झाला. संभाजीराजांच्या निधनानंतर महाराष्ट्रात लष्करी नोकऱ्यांबद्दल जहागीर देण्याच्या सरंजामशाही पद्धतीचे पुनर्जीवन झाले. त्यात मराठ्यांच्या सत्तेच्या हासाची कारणे दडली असावीत, असे डॉ. सेन यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी लष्करी व्यवस्थेचा मुळापासून अभ्यास केला. असे करीत असताना डॉ. सेन यांनी मराठी संस्थांचा विशेषतः चौथाई आणि सरदेशमुखी, नौदलाशी संबंधित लष्कराची बांधणी आणि आंग्रे यांची भूमिका, मराठ्यांचे नौदल प्रमुख अशा कितीतरी गोष्टींचा अभ्यास केला.

अशा प्रकारे खोलात जाऊन अभ्यास करत असताना, डॉ. सेन यांच्या लक्षात आले की, मराठी किंवा इतर देशी कागदपत्रांमध्ये मराठ्यांच्या आरमाराच्या इतिहासावर फारसा प्रकाश टाकलेला नव्हता. त्यामुळे या विषयाच्या अभ्यासकाला पूर्णपणे परकीय कागदपत्रांवर विसंबून रहावे लागते. म्हणून डॉ. सेन यांनी लंडन, पॅरीस, लिस्बन, इव्होरा आणि गोवा येथील जेवढी मिळतील तेवढ्या हस्तलिखितांचा आणि इतर दुर्मिळ जुन्या कागदपत्रांचा अभ्यास केला. हा अभ्यास करताना त्यांना विशेषत्वाने एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाचे अधिक चांगले आकलन होण्यासाठी पोर्तुगीज भाषेच्या अभ्यासाला महत्त्व देणे आवश्यक आहे." डॉ. सेन हे सच्चे इतिहासकार होते त्यामुळे 'इतिहासकार कागदपत्रांच्या मदतीने काम करतो' या तत्त्वावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच ते सतत ऐतिहासिक कागदपत्रांच्या शोधात असत. कागदपत्रांना दुसरा पर्यायच नाही, ऐतिहासिक कागदपत्रे नाहीत तर इतिहास नाही अशी त्यांची धारणा होती. समकालीन साधनेच इतिहासलेखनाची रेखीव इमारत उभी करण्याची गरज भागवितात, असे जर्मन इतिहासकार रँके याचे मत होते. डॉ. सेनसुद्धा रँकेच्या मताशी सहमत होते." आपण यापूर्वी पाहिले आहे की, आशुतोष मुखर्जीच्या योजनेचा एक भाग म्हणून, डॉ. सेन यांनी मराठी बखरीचे भाषांतर करून इतिहासाच्या अभ्यासाला सुरुवात केली होती. मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांनी सुरुवातीला ५०० रुपयांची मदत केली होती. १९१९ मध्ये 'हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशन'ची स्थापना ब्रिटिश सरकारने केली. इतिहासाच्या संशोधकांना ऐतिहासिक कागदपत्रे छापण्यासाठी चालना देण्याचा या कमिशनचा हेतू होता. कमिशनच्या कामाचा एक भाग म्हणून शासनाने 'सोअर्स बुक ऑफ मराठा हिस्ट्री खंड १' १९२९ मध्ये प्रकाशित केला. एच. जी. रॉलिन्सन आणि आर. पी. पटवर्धन हे दोघे या खंडाचे संपादक होते. या खंडात काही संस्कृत, मराठी आणि फार्सी कागदपत्रांच्या इंग्रजी भाषांतरांचा समावेश होता. तसेच शिवाजीच्या काळाशी संबंधित परकीय प्रवाशांनी लिहिलेल्या इतिहासाचा काही भाग या खंडात दिलेला होता.

डॉ. सेन यांनी १९२७ मध्ये 'फॉरीन बायोग्राफीज ऑफ शिवाजी' हा ग्रंथ लिहिला. 'सोअर्स बुक'मध्ये घेतलेली सर्व कागदपत्रे वगळून, डॉ. सेन यांनी काही परकीय कागदपत्रे निवडली. त्यासाठी त्यांनी शिवाजीराजांच्या कारकीर्दीशी संबंधित पोर्तुगीज, फ्रेंच आणि डच कागदपत्रांचे भाषांतर केले. या ग्रंथासाठी त्यांनी परकीय कागदपत्रे निवडली. याचे कारण देताना डॉ. सेन लिहितात, "शिवाजी राजा जिवंत असतानाच, त्याची कीर्ती युरोपमध्ये पोहोचली होती. शिवाजी राजाची पराक्रमी वृत्ती, धाडसी कृत्ये, हुशारीने केलेले डावपेच यांनी समकालीन इंग्रजी, फ्रेंच, डच, पोर्तुगीज आणि इटालियन लेखकांना आकर्षित केले होते. त्यांच्या लिखाणातून जगात मराठ्यांचे नाव होण्यापूर्वी बऱ्याच आधी शिवाजी राजाचे नाव पोहोचले."

डॉ. सेन यांना परकीय लिखाणातील उणिवांची चांगली कल्पना होती. तरीसुद्धा ते म्हणतात, "या लेखनात निश्चितच काही दोष होते. परंतु मराठ्यांच्या इतिहासाचा गांभीर्याने अभ्यास करणारा कोणताही अभ्यासू विद्यार्थी, या युरोपियन लेखांच्या लिखाणाच्या पुराव्यांकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही." जर एखाद्याने युरोपियन पुरातत्त्व विभागाच्या लिस्बन, हेग, लंडन आणि पॅरीस येथील रेकॉर्डस् ऑफिसला भेट दिली आणि तेथे जतन केलेली मौल्यवान कागदपत्रे पाहिली तरच त्याला डॉ. सेन यांनी काढलेल्या वरील विधानांचे महत्त्व लक्षात येईल. पोर्तुगीज, डच आणि फ्रेंच भाषेतील कागदपत्रांचा हुशारीने उपयोग करून घेतला नाही, तर मराठ्यांच्या इतिहासाला अपुरेपण येईल, इतिहास पूर्ण होणार नाही. या खंडात समकालीन युरोपियन कॉस्मो द ग्वार्द, जीन दे थिवेनॉट, बार्थलेमी कॅरे, मार्टिन व्हॅलेन्टाइन यांनी लिहिलेली शिवचरित्रे आणि डच आणि इंग्रजी कागदपत्रांचे सारांश यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय पुरातत्त्व विभागाचे संचालक म्हणून काम बघताना डॉ. सेन यांनी परकीय साधनांवरून अजून एक महत्त्वाचे काम केले. त्यांनी मध्ययुगीन काळातील थिवेनॉट आणि कॅरेरी या फ्रेंच प्रवाशांचे प्रवासवर्णन भाषांतरित केले. इतर युरोपियन भाषांमधील भाषांतरामध्ये भारताशी संबंधित भाग गाळलेला होता. परंतु भारतीय पुरातत्त्वाचे प्रमुख म्हणून डॉ. सेन यांना या दोन फ्रेंच प्रवाशांचे भारताबद्दलचे मत उमटलेल्या भागाचे भाषांतर करण्याची गरज वाटली. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले आणि 'इंडियन ट्रॅव्हल्स ऑफ थिवेनॉट अॅन्ड कॅरेरी' या नावाने इंग्रजी भाषांतराचा ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ १९४९ मध्ये राष्ट्रीय पुरातत्त्व विभाग, नवी दिल्ली तर्फे प्रकाशित करण्यात आला." या मोठ्या कामांबरोबरच डॉ. सेन यांचे मराठ्यांच्या इतिहाससंबंधीचे काही लेख नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले. सर्व लेख 'स्टडीज् इन इंडियन हिस्ट्री' या नावाने पुस्तकरूपाने १९३० मध्ये कलकत्ता विद्यापीठाने एकत्रित केले. यामध्ये गोव्याच्या ऐतिहासिक कागदपत्रांवर शंभरहून जास्त पानांचा दीर्घ लेख आहे. अस्सल कागदपत्रे पहावीत या हेतूने डॉ. सेन यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या डॉ. बॅगेन्झा कुन्हा यांच्याकडून पोर्तुगीज भाषा शिकून घेतल्यानंतर गोवा पुरातत्त्व विभागात जाऊन कागदपत्रे पाहिली आणि १९२५ मध्ये 'हिस्टॉरिकल रेकॉर्डस् अॅट गोवा' असा एक अहवाल प्रसिद्ध केला. सतराव्या शतकात मराठे आणि पोर्तुगीज यांच्यातील संबंधकसे होते, हे समजण्यासाठी हा अहवाल खूपच उपयोगी आहे. मध्ययुगीन काळात चौथाई पद्धत कशी सुरू झाली, याबद्दलची चर्चा

डॉ. सेन यांनी गोवा पुरातत्त्व विभागातील अप्रकाशित पोर्तुगीज कागदपत्रांवरून केलेली आहे. या कागदपत्रांचा उपयोग मराठ्यांच्या, विशेषतः आंग्रे यांच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या आरमारी हालचालींचा पुनर्विचार करण्यास झाला. डॉ. सेन या अहवालाचा हेतू विशद करताना एक गोष्ट नजरेत आणून देतात, ती म्हणजे भारतीय इतिहाससंबंधी कोणत्या नवीन बाबी सर्वांसमोर आणतात, हे दाखविणे." ('प्रकाशित आणि अप्रकाशित पोर्तुगीज कागदपत्रे') इतिहासाच्या अभ्यासकांना इतिहास समजून घेताना मूळची पोर्तुगीज साधने दुर्लक्षून चालणार नाहीत. तसेच आत्तापर्यंत फारच कमी कागदपत्रे प्रकाशित झालेली असल्यामुळे पोर्तुगीज ऐतिहासिक कागदपत्रांचे बरेच काम बाकी आहे. त्यामुळे आधुनिक भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना आणि विद्यार्थ्यांना या क्षेत्रात अभ्यास आणि संशोधन करण्यास खूप वाव आहे.'

डॉ. सेन यांच्या वरील सूचनेकडे, मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधकांनी गंभीरपणे लक्ष दिले नाही, ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे. अर्थात कालांतराने, १९७८ साली भारतीय आणि पोर्तुगीज संशोधक-अभ्यासकांनी एका

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राची या विषयाचा गंभीरपणे अभ्यास करण्यासाठी स्थापना केली. या परिषदेची दर दोनतीन वर्षांनी भारतात आणि परिषदेत नियमितपणे अधिवेशने भरतात व त्यांचे अहवालही प्रसिद्ध केले जातात ही प्रशंसनीय बाब आहे.

गोव्याच्या दफ्तरखान्यासंबंधीच्या या दीर्घ अहवालाप्रमाणेच, डॉ. सेन यांनी मराठ्यांच्या कर्नाटकातील मोहिमा, हैदर आणि टिपू सुलतान यांच्यासंबंधीही लेखन केले आहे. तसेच 'मारक्विस ऑफ ॲलोर्नाज इन्स्ट्रक्शन्स' या नावाच्या एका पोर्तुगीज साधनाचे संपूर्ण भाषांतर अभ्यासकांना उपलब्ध करून दिले आहे. मारक्विस ऑफ ॲलोर्ना हा पोर्तुगीज भारताचा व्हॉइसरॉय होता. त्याने सहा वर्षे या हुद्द्यावर काम केले आणि निवृत्तीनंतर पोर्तुगीजांनी जिंकलेल्या काही प्रदेशांचा अत्यंत उत्तम असा एक छोटासा 'न्यू कॉन्वेस्ट' नावाचा ग्रंथ त्याने लिहिला."

**डॉ. सेन यांच्या कामाचे मूल्यमापन**

डॉ. सेन हे देशभक्त आणि राष्ट्रवादी इतिहासकार होते. तरुणपणी त्यांनी काँग्रेसच्या स्वदेशी चळवळीत हिरिरीने भाग घेतला होता. बहुधा त्यामुळेच त्यांना भारतीय इतिहासात मराठ्यांचे स्थान हा विषय अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी सर्वार्थाने योग्य वाटला असावा.

डॉ. सेन यांनी केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाचे सिंहावलोकन करताना असे लक्षात येते की, त्यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन चरित्रात्मक नसून संस्थात्मक होता. मराठी, पोर्तुगीज, फ्रेंच आणि डच कागदपत्रांचे भाषांतर केल्याने त्यांना शिवाजी राजाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल खूपच कुतूहल वाटले यात शंका नाही. परंतु मराठ्यांचा नायक शिवाजी राजा ह्याचे चरित्र लिहिण्याचा पारंपरिक मार्ग त्यांनी स्वीकारला नाही. त्याऐवजी त्यांनी स्वकीय आणि परकीय साधनांचा अभ्यास करून शिवकालीन मुलकी आणि लष्करी व्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. कारण या दोन अत्यंत महत्त्वाच्या सुनियोजित व्यवस्थाच जवळजवळ पुढील दोन शतके भारतीय इतिहासाचे बलस्थान ठरल्या.

डॉ. सेन यांनी १९२० ते १९३० या दशकात इतिहासाचा खूप अभ्यास केला. परंतु त्यानंतर आयुष्याच्या उत्तरार्धातील तीस वर्षांत त्यांना कुठलेही जास्तीचे मराठ्यांच्या इतिहासाचे किंवा वर उल्लेखलेले संशोधनाचे काम हातात घेता आले नाही. कारण डॉ. सेन यांना कलकत्त्याहून दिल्लीला प्रस्थान ठेवावे लागले. दिल्लीत ते 'इम्पिरिअल रेकॉर्डस्'चे संचालक म्हणून काम पाहू लागले. कालांतराने 'इम्पिरिअल रेकॉर्डस्'चे नाव बदलून 'नॅशनल अर्काव्हज् ऑफ इंडिया' असे ठेवण्यात आले. या नोकरीनंतर डॉ. सेन यांची दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नेमणूक झाली. त्यांचा बराचसा वेळ विद्यापीठाच्या प्रशासकीय कामात जाऊ लागला. त्यामुळे इतिहास संशोधनात काही भरीव कामगिरी करण्यासाठी त्यांना वेळ काढणे मुश्किल झाले. डॉ. सेन यांचे इतिहासातील शेवटचे मोठे काम म्हणजे '१८५७' हा ग्रंथ! शासनाने त्यांना हे काम करण्यासाठी सांगितले होते. डॉ. सेन यांनी ते स्वीकारले आणि दीड वर्षात पूर्ण केले. इंडियन हिस्ट्री काँग्रेसच्या स्थापनेपासून डॉ. सेन या संस्थेशी निगडित होते. ते संस्थेचे कार्यवाह होते आणि ते एका अधिवेशनाचे अध्यक्षही होते. डॉ. सेन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात इतिहासकाराची राजकारणातील भूमिका काय असावी, यावर आपले विचार व्यक्त केले. ते म्हणतात,"इतिहासकाराचे देशप्रेम आणि इतिहासाची चांगली समज यावर राजकारणी लोकांनी निर्धास्त रहावे. परंतु त्याचबरोबर राजकीय नेत्यांनी, इतिहासकार हा त्याच्या पेशामुळे आणि प्रशिक्षणामुळे सर्वप्रथम एक संशोधक असतो. इतिहासाची मांडणी करणे आणि आवश्यकतेप्रमाणे भूतकालीन घटनांचे अर्थ सांगणे हे त्याचे व्यावसायिक कर्तव्य असते. त्याने घेतलेले निर्णय जर तर्कशुद्ध असतील तर ते नाकारता येणार नाहीत. परंतु त्याच्या कल्पनाशक्तीला उपलब्ध ऐतिहासिक साधने खीळ घालू शकतात. अस्सल पुराव्याच्या मर्यादा तो ओलांडू शकत नाही. इतिहास काही तत्त्वांचा उपदेश करीत नाही, त्याला कोणतेही तत्त्वज्ञान सांगावयाचे नसते आणि कोणत्याही नीतिमत्तेचा निर्देश तो करीत नाही." यावरून डॉ. सेन यांचा इतिहासाच्या अभ्यासाकडे बघण्याचा दृष्टिकोन कळतो. तसेच ऐतिहासिक कागदपत्रांच्या महत्त्वावर असलेला अढळ विश्वास व्यक्त होतो."

डॉ. सेन भारतीय इतिहास परिषदेच्या महत्त्वाच्या सदस्यांपैकी एक होते. परिषदेच्या अधिपत्याखाली भारताचा संक्षिप्त इतिहास १२ खंडांत प्रकाशित करण्याची योजना आखली गेली त्यात डॉ. सेन यांचा सहभाग होता. त्यांनी नवव्या खंडाच्या (१७१२-७२) संपादनाची जबाबदारीही स्वीकारली. परंतु अनेक कामांमध्ये व्यस्त राहिल्याने, ते हे काम करू शकले नाहीत. १९२० नंतर डॉ. सेन मराठ्यांच्या इतिहासावर कोणतेही मोठे काम करू शकले नाहीत, हे खरे. परंतु मराठ्यांच्या मुलकी आणि लष्करी व्यवस्थेचा अभ्यास, मराठी आणि परकीय साधनांचे भाषांतर या दोन्ही महत्त्वाच्या कामांमुळे मराठा इतिहासलेखनात डॉ. सेन यांना अढळ स्थान प्राप्त झाले आहे.

डॉ. सेन यांच्या इतिहासविषयातील कामाचे मूल्यमापन करताना, डॉ. ए. सी. बॅनर्जी म्हणतात, "सतराव्या अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातील भारतीय इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला डॉ. सेन यांच्या इतिहासातील योगदानाचे ऋण कृतज्ञतापूर्वक मानावे लागेल. भविष्यकाळातील नव्या संशोधनाने डॉ. सेन यांच्या ऐतिहासिक अनुमानाला पुरवणी जोडली जाईल किंवा त्यातील काही गोष्टींमध्ये सुधारणा केल्या जातील. परंतु त्या पूर्णपणे रद्द होतील, असे संभवत नाही. कारण डॉ. सेन यांचे संशोधन तर्कशुद्ध, सखोल अभ्यास केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या मजबूत पायावर केले गेले आहे आणि ऐतिहासिक घटनांचे निष्कर्ष हे समतोल बुद्धीने, कोणत्याही प्रकारची तडजोड न करता त्यांनी मांडलेले आहेत. कलकत्ता विद्यापीठाचे तेव्हाचे कुलगुरू सर आशुतोष मुखर्जी यांनी प्रादेशिक इतिहासाच्या, विशेषतः मराठा, शीख आणि रजपूत यांच्या इतिहासाच्या संशोधनाला विद्यापीठाच्या इतिहासभागात अग्रक्रम दिला.

सुरेंद्रनाथ सेन यांनी या विभागात मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनात पुढाकार घेतला आणि अतिशय प्रशंसनीय असे काम केले. त्यामुळे त्या विभागात येणाऱ्या तरुण संशोधकांपुढे, डॉ. सेन यांच्या कामाचा आदर्श कायम राहिला.

डॉ. सेन यांच्या कामाची धुरा, त्यांच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पेलली. डॉ. प्रतुलचंद्र गुप्ता यांनी लंडन विद्यापीठात वाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी 'दुसरा बाजीराव आणि ईस्ट इंडिया कंपनी' या विषयावर प्रबंध सादर करून ती पदवी मिळवली आणि त्या विषयावर आधारित असा आपला ग्रंथ १९३९ साली प्रसिद्ध केला. मराठ्यांच्या इतिहासाच्या शेवटच्या पर्वावर या ग्रंथाने बरीच माहिती पुरवली आहे. डॉ. सेन यांचे दुसरे विद्यार्थी अनिलचंद्र बॅनर्जी यांनी पहिल्या माधवराव पेशव्यांचे चरित्र लिहिले (१९४३) मराठ्यांचे इतिहासकार प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांनी या ग्रंथाचे सखोल परीक्षण केले. तेव्हा त्यांनीही मोकळ्या मनाने डॉ. बॅनर्जी यांच्या कामाचे कौतुक केले, "बॅनर्जी यांनी आपल्या ग्रंथात अनेक नवीन अप्रकाशित कागदपत्रांचा उपयोग करून हे चरित्र लिहिल्याने इतिहासाच्या ज्ञानात, निराळी, महत्त्वपूर्ण भर घातली आहे. " मध्यंतरी बराच काळ गेल्यावर डॉ. सेन यांच्या परंपरेतील बंगाली विद्वान लेखक डॉ. शैलेन्द्रनाथ सेन यांनी दोन मोठे ग्रंथ लिहिले. एक 'अँग्लो मराठा रिलेशन्स १७७२-१७८५' (१९६१) आणि दुसरा 'अँग्लो-मराठा रिलेशन्स १७८५-१७९६' (१९७४) या दोन्ही ग्रंथांमधून पानिपतच्या युद्धानंतरचा मराठ्यांचा इतिहास वाचायला मिळतो. सध्या डॉ. एस. एन. सेन 'फॉल ऑफ दि मराठा एम्पायर' या ग्रंथाचे लेखन करीत आहेत. त्यामध्ये १७९६ च्या खर्डाच्या लढाईपासून ते तिसऱ्या अँग्लो-मराठा युद्धापर्यंतचा म्हणजे मराठ्यांच्या सत्तेच्या विसर्जनापर्यंतचा (१८१८) इतिहास दिलेला आहे. या ग्रंथात प्रामुख्याने मराठा राज्यसंघाचे (Confedaracy) घटक- पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड यांनी मराठे सरदार म्हणून भारताच्या विशाल राजकीय पटावर केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. थोडक्यात, डॉ. शैलेंद्रनाथ सेन यांचे हे चार खंड म्हणजे १७७२-१८१८ या कालखंडाचा कालानुक्रमे मांडलेला इतिहास असे म्हणता येईल. जदुनाथ सरकारांनी 'मोगल साम्राज्याचे पतन' जसे चार खंडांत मांडले आहे. तसेच काम कांही अंशी डॉ. सेन यांनी मराठ्यांच्या सत्तेच्या हासाचा इतिहास या चार खंडांद्वारे केले आहे.

मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासात बंगालमधील नवीन पिढीसुद्धा मुद्दाम लक्ष घालते आहे. संशोधनात रस घेत आहेत. डॉ. उपेंद्र नारायण चक्रवर्ती यांनी 'अँग्लो-मराठा रिलेशन्स अँन्ड माल्कम १७९८-१८३०' हा संशोधनात्मक ग्रंथ १९७९ मध्ये लिहिला. प्रांजल कुमार भट्टाचार्य यांनी १९८४ मध्ये 'ब्रिटिश रेसिडेन्टस् अॅट पूना १७८८-१८१८' हा ग्रंथ

लिहिला. यामध्ये भट्टाचार्य यांनी ब्रिटिशांच्या कारवायांचे राजकारणाचे विश्लेषण केले आहे. दुसरे बंगाली विद्वान सुधिन्द्रनाथ कानुमगो यांनी यशवंतराव होळकरांचे व्यक्तिचित्र लिहिले. 'ए गोल्डन रोग' (१९६५). डॉ. कानुमगो यांनी दिलेले या ग्रंथाचे शीर्षक या विषयाला फारसे साजेसे नाही असे वाटते.

मराठ्यांच्या लष्करी इतिहासाचे, नवीन पिढीच्या तरुण इतिहासकारांना नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. पी. डी. खन्ना यांनी 'दि सेकंड मराठा कॅम्पेन (१८०४-१८०८)' या पुस्तकात जेम्स यंग या ब्रिटिश आर्टिलरी ऑफिसरने दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धावर लिहिलेल्या वृत्तांचे पुनर्मुद्रण करून त्याला अभ्यासू टिपणांची जोड दिली आहे. ॲन्थनी एस. बेनेल यांनी 'द मेकिंग ऑफ आर्थर वेलस्ली' (१९९७) या आपल्या ग्रंथात दुसरे इंग्रज- मराठे युद्ध - यामध्ये ऑर्थर वॅलस्लीने केलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या त्याच्या कामगिरीमुळेच त्याला 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन' हा किताब मिळाला. डॉ. बेनेले हे संरक्षण मंत्रालयातीलएक सेवानिवृत्त अधिकारी असून, ऑक्सफर्ड येथील 'कॉरपस ख्रिस्ती कॉलेज'चे सदस्य आहेत.

कलकत्ता विद्यापीठाचे डॉ. अनिरुद्ध रे हे फ्रेंच साधनांचे एक चिकित्सक अभ्यासक असून त्यांनी डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी संपादित केलेल्या 'फॉरेन बायग्रॉफीज ऑफ शिवाजी' या ग्रंथाच्या नव्या आवृत्तीस (१९७७) एक विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. त्यांचा 'ट्रेड पॉलिटिक्स अँड प्लंडर- द मराठाज् ॲट कॅम्बे (१७२५-१८२५) हा एक अभ्यासपूर्ण ग्रंथ अलीकडेच (२००६) प्रसिद्ध झाला आहे.

## न्या. महादेव गोविंद रानडे

महाराष्ट्रातील समाजाला सुधारणाभिमुख करून प्रबोधनाचा आणि नवजागरणाचा ध्यास घेतलेल्या व्यक्तींमध्ये न्या. रानड्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. तसा रानड्यांचा पिंड समाजसुधारकाचा. वर्तमान समाजस्थितीचा आणि त्या अनुषंगाने सुधारणांचा विचार करावयाचा म्हणजे गतकालीन वाटचालीचा मागोवा घ्यावयाचा. आजूबाजूला घडत असलेल्या, घडून गेलेल्या घडामोडींचा अन्वयार्थ लावायचा. न्यायमूर्ती रानड्यांनी समाजसुधारणेचा आग्रह धरीत हेही सारे केले आणि त्यांचा इतिहास लेखनाशी संबंध आला. सुधारणावादी राजकीय विचारवंत म्हणून न्यायमूर्ती रानड्यांचे नाव सर्वतोमुखी आहे त्या रानड्यांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व या ठिकाणी आपल्याला समजून घ्यावयाचे आहे.

न्यायमूर्ती रानड्यांनी इतिहासावर फार काही विस्तृत अशी ग्रंथसंपदा निर्माण केली नाही. ग्रँट डफ जसा त्याच्या मराठ्यांच्या इतिहासामुळे ख्यातकीर्त झाला तसेच न्यायमूर्ती रानडे 'राईज ऑफ मराठा पॉवर' या त्यांच्या एकमेव आणि अप्रतिम अशा ग्रंथामुळे नावाजले. या ग्रंथलेखनाची पार्श्वभूमी आणि रानड्यांचे इतिहासविषयक चिंतन समजून घेण्याअगोदर आपण न्या. रानड्यांचे चरित्र थोडक्यात समजून घेऊ.

**जन्म आणि बालपण** -

महादेव गोविंद रानड्यांचा जन्म १८ जानेवारी १८४२ या दिवशी नाशिक जिल्ह्यातील निफाड या गावी झाला. तसे रानडे घराणे मूळचे सांगली संस्थानातले. कुटुंब मध्यवर्गीय. साहजिकच इंग्रजी बुके शिकून कंपनी सरकारात कारकुनी करणारे. क्वचित कुणी मामलेदारपदापर्यंत गेलेले. गोविंदराव रानडे हे सरकारात कारकून होते. महादेव गोविंद रानड्यांचे शिक्षण आणि बालपणही सांगली-कोल्हापूर-परिसरात होते. माध्यमिक शिक्षणार्थ महादेव हा तरुण मुंबईत आला. असामान्य बुद्धीचा विद्यार्थी म्हणून तो नावाजला. शालेय जीवनातच त्याला वाचनाची आवड लागली. वाचनाचा व्यासंग वाढतच गेला. १८६२ साली रानडे पदवीधर झाले. १८६४ ला त्यांनी एम. ए. पदवी मिळविली. १८६६ ला ते एल. एल. बी. परीक्षा पास झाले. तसे शिक्षण पूर्ण झाले; पण व्यासंग आणि वाचन-मनन चालूच राहिले. इतिहास आणि अर्थशास्त्रहे त्यांचे आवडीचे विषय. निरनिराळ्या क्षेत्रात नोकरी करीत त्यांनी इतिहासाच्या वाचनाचा आणि चिंतनाचा अभ्यास कायम ठेवला.

**रानडे न्यायमूर्ती झाले -**

१८६६ ला शिक्षण आटोपल्यावर उपजीविकेचे साधन म्हणून आणि आवड म्हणून महादेव गोविंद रानडे काही काळ ओरिएंटल ट्रान्सलेटर झाले. ईस्ट इंडिया कंपनीत आणि ब्रिटिश सरकारातही पौर्वात्य भाषांतील कागदपत्रे इंग्रजीत भाषांतरित करण्याचे काम या ओरिएंटल ट्रान्सलेटरला करावे लागायचे. बहुतेक मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांची चांगली जाण असणारी हुशार मुलं या पदावर नेमली जात. कालांतराने रानड्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. एल.एल.बी. चीही पदवी असल्यामुळे स्मॉल कॉज कोर्टात ते मॅजिस्ट्रेटपदी नेमले गेले. काही काळ पोलिस मॅजिस्ट्रेटचे पदही त्यांनी भूषविले. १८७१ साली पुण्याच्या न्यायासनावर त्यांची नेमणूक झाली व महादेव गोविंद रानडे हे न्यायमूर्ती झाले. पुढे १८९३ साली ते मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश झाले.

**नवजागरणाचा ध्यास -**

विद्यार्थी दशेतच रानडे पाश्चात्त्य ज्ञानाने भारावले होते. युरोपातली प्रबोधन चळवळ आणि विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे पाश्चात्त्य जगात झालेली आधुनिक युगाची नांदी रानड्यांना मोहवीत होती. पाश्चात्त्य जग जसे मध्ययुगातून बाहेर पडले तसे आपण भारतीयांनी देखील मध्ययुगीन परंपरांचा-रूढींचा-निरर्थक चालींचा - त्याग करून आधुनिकतेकडे वाटचाल केली पाहिजे असे त्यांना वाटे. तशी काही प्रमाणात भारतीय समाज ढवळून निघायला एव्हाना सुरुवातही झाली होती. पण सनातन्यांमुळे या नवजागरणाला अपशकुन घडत होता. न्या. रानड्यांना नवजागरणाचा ध्यास लागला होता. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, स्त्रियांची दुरवस्था, बालविवाहासारख्या रूढी, समाजातील जातीव्यवस्था, उच्चनीचता या सर्वांविषयी त्यांना चीड होती. हे सगळे आपण बदलले पाहिजे असे त्यांना वाटे. समाजातल्या परिस्थितीविषयी असंतोष व्यक्तविणारे लिखाण ते सतत करीत राहिले. सुधारणांचा आग्रह धरीत राहिले. असे जरी असले तरी त्यांचे कुटुंब मात्र अत्यंत सनातनी विचारांचे होते. त्यामुळे त्यांची प्रचंड मानसिक कुचंबना झालेली दिसते. अनेक गोष्टी त्यांना मनाविरुद्ध कराव्या लागल्या.

**प्रार्थना समाजाच्या व्यासपीठावरून -**

इसवी सनाच्या १५ व्या शतकात तिकडे युरोपात जसे प्रबोधन घडून आले, धर्मसुधारणा झाल्या, नवविचारांचा प्रभाव जाणवू लागला तसे आपल्याकडेही घडावे असे न्यायमूर्तींना वाटे. स्वदेशबांधवांचाही धार्मिक उद्धार व्हावा, धर्मसुधारणा घडावी, सनातन रूढी परंपरांचे जोखड झुगारून नव्याचा स्वीकार करावा यासाठी प्रयत्न करणारे एक व्यासपीठ म्हणून प्रार्थना समाज संघटित झाला. प्रार्थना समाजाच्या उभारणीत न्या. रानड्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. प्रार्थना समाजाची कैफियत मांडणारा एक निबंध न्या. रानड्यांनी लिहिला होता त्यातून त्यांनी एकेश्वरनिष्ठेची भूमिका स्पष्ट केली. ख्रिस्ती धर्माच्या अनुकरणातून प्रार्थनावादी मंडळी एकेश्वरनिष्ठा दाखवीत आहेत आणि हिंदुधर्माची पायमल्ली करीत आहेत अशी टीका होत होती. त्या टीकेला प्रत्युत्तर म्हणून हा खटाटोप त्यांनी केला.

**सार्वजनिक सभा आणि स्वदेशी -**

बुद्धिनिष्ठ विवेकवादी विचारांचा प्रभाव दर्शविणारी आणि सुधारणांचा आग्रह धरणारी आणखी एक संस्था म्हणजे सार्वजनिक सभा. सार्वजनिक सभेच्या विचारांचा स्रोत मुख्यतः न्या. रानड्यांच्या चिंतनातून आलेलाअसे तर आचरणात्मक भाग सार्वजनिक काकांचा असे. विचार माधवरावांचा आणि आचार सार्वजनिक काकांचा असे सामान्यपणे सार्वजनिक सभेबाबत म्हटले जाई. इ.स. १७८२ साली सार्वजनिक सभेने स्वदेशीचा विचार अंगीकारला. आर्थिक परिस्थितीचे सर्वेक्षण काम हाती घेतले. तात्पर्य महाराष्ट्रातील समाजरूपी थंड गोळ्याला जागृत करण्याचे प्रयत्न न्या. रानडे सातत्याने करीत राहिले. सनातन्यांनी त्यांना सतत विरोध केला. रानड्यांचा सनातन्यांना असलेला विरोध मात्र अत्यंत डोळस होता. त्यांनी पुण्यात वेदशास्त्रोत्तेजक सभेला प्रोत्साहन दिले. भूमिका ही की या सभेने वेदांचे अर्थ समजून उमजून वेदपठणास प्रोत्साहित करावे. हीच भूमिका बुद्धिवादी विवेकनिष्ठांची होती. स्त्रियांच्या शिक्षणासाठी

फिमेल हायस्कूलचा प्रयत्न करण्यात आला. या हायस्कूलच्या उभारणीत न्या. रानड्यांचा पुढाकार होता. रमाबाईंच्या शारदासदनालाही न्या. रानड्यांनी पाठिंबा दर्शविला होता.

भारतीय समाजात सुधारणा झाल्याशिवाय तरणोपाय नाही, या सुधारणा करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले जावेत ही भूमिका घेऊन न्या. रानडे कायद्याने सुधारणा करावी, हा विचार आग्रहाने मांडत राहिले. ब्रिटिश सरकारच्या सुधारणा कायद्यांचे त्यांनी स्वागतच केले. सुधारणांसाठी सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरूनही न्या. रानडे सक्रिय राहिले. सुधारक शक्तीचे एक समर्थ संघटन न्या. रानड्यांनी उभारले. १८८५ साली राष्ट्रीय सभेच्या स्थापनेतही त्यांचा सहभाग होता. राष्ट्रीय सभेबरोबरच सामाजिक परिषदाही भरवल्या गेल्या. १८९५ पर्यंत अशी परिस्थिती होती. त्यानंतर मात्र सामाजिक परिषदा वेगळ्या भरत गेल्या.

**न्या. रानड्यांचे इतिहास चिंतन** -

न्या. रानड्यांचा पिंड हा मूलतः सामाजिक सुधारक आणि राजकीय विचारवंताचा, इतिहास संशोधन आणि इतिहास-लेखन हे काही त्यांनी आपले जीवनातले प्रमुख उद्दिष्ठ ठरवलेले नव्हते. भारतीय समाजाच्या तत्कालीन स्थितीचे विश्लेषण करण्याच्या निमित्ताने न्या. रानडे इतिहासाकडे वळले. इंग्रजी शिक्षणातून झालेले पाश्चात्त्य घडामोडींचे ज्ञान त्यांना आत्मपरीक्षणास प्रेरित करणारे ठरले. भारतीय समाजासारखाच पाश्चात्त्य समाजही १५ व्या शतकापर्यंत अत्यंत मागासलेला आणि सनातनी विचरांनी भारावलेला होता. मध्ययुगीन अंधकारात तो समाजही चाचपडत होता. प्रबोधन घडून आले, धर्मसुधारणा चळवळ झाली, विद्येचे पुनरुज्जीवन झाले आणि पाश्चात्त्य समाजात प्रचंड स्थित्यंतर घडून आले. आपणही आपल्या समाजात अशी स्थित्यंतरे घडवून आणावीत, सुधारणा कराव्यात असे न्या. रानड्यांना वाटत असे. बुद्धिनिष्ठेने आणि शुद्ध विवेकवादी दृष्टी बाळगून आपण आपल्यात प्रचलित असलेल्या रूढींचे, चालीरीतींचे, कर्मकांडांचे, अनेकेश्वरवादातून निर्माण झालेल्या असंख्य देवदेवतांसंबंधीचे नव्याने विचार करण्याची गरज आहे असे ते म्हणत.

**भूतकाळाशी नाते कधीच तुटत नसते** -

न्यायमूर्ती राड्यांनी इतिहासाचे समालोचन करीत गतकाळातही अनेकदा सुधारणा झाल्या आणि त्या सुधारणा पारंपरिक पद्धतीने झाल्या हे सांगितले. या पद्धतीने जुने ग्रंथ घेऊन बदलत्या परिस्थितीनुसार त्याचा अन्वयार्थ लावला जात असे. असाच अन्वयार्थ आजही लावणे अगत्याचे आहे असे ते म्हणत. भूतकाळाशी नाते कधीच तुटत नसते याची न्या. रानड्यांना जाणीव होती. त्यांना सामाजिक सुधारणांच्या संदर्भात जुन्यावर नवे कलम करावयाचे होते. जुन्याचे समूळ उच्चाटन करण्याचे त्यांच्या मनात कधीच नव्हते. सगळ्याच बऱ्यावाईट गोष्टींचे पुनरुज्जीवन त्यांना नको होते. त्यांच्या इतिहास चिंतनातूनच पुढे आलेला विचार हा होता की सुधारणा ही कधीच नवनिर्मिती नसते तर विस्मृत विशुद्ध अशा आज्ञांचे ते पुनःप्रकटीकरणअसते. गतकालीन वाटचालीत असे सतत घडत गेले आहे. कालबाह्य गोष्टी टाकून दिल्या आहेत, कालानुरूप नव्याचा स्वीकार समाजाने केला आहे.

**इतिहासाचे विश्लेषण**

न्या. रानड्यांनी भारताच्या दुरवस्थेची कारणमीमांसा देण्याच्या निमित्ताने इतिहासाच्या वाटचालीचा माग काढला. भारताच्या दुरवस्थेस केवळ राजकीय पारतंत्र्य ही एकच गोष्ट कारणीभूत नसून सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा अनेक बाबी जबाबदार आहेत हे त्यांनी स्पष्टपणे मांडले. सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिवर्तनातून जनता पेटून उठली पाहिजे असे ते म्हणत. या उठावानंतरच खरे तर राजकीय क्रांती घडेल असा त्यांना विश्वास होता. जागतिक इतिहासाचे विश्लेषण करीत भारताच्या संदर्भात राजकीय सुधारणांपेक्षा त्यांनी सामाजिक सुधारणांची गरज आधी प्रतिपादिली.

सामाजिक सुधारणांची आवश्यकता प्रतिपादन करताना त्यांनी केलेले विश्लेषण मोठे मार्मिक आणि भेदक आहे. जगाच्या इतिहासात व्यक्ती विरुद्ध समाजाने जेवढा जुलूम केलाय तेवढा कुठल्याही शासनाने केलेला नसेल असे त्यांचे मत होते. भारताच्या गतकालीन वाटचालीतही त्यांना हेच आढळले. व्यक्ती विरुद्ध समाज जेवढा जुलूम आणि छळ करू शकतो तेवढा करणे शासनालाही शक्य नसते. छळाची साधने वसंधी जेवढ्या समाजाला उपलब्ध असतात तितक्या शासनाला उपलब्ध नसतात म्हणून समाजाचा जुलूम शासनाच्या जुलमापेक्षा कितीतरी पटीने अधिक असतो. व्यक्तीला समाजाच्या जुलमापासून मुक्त करावयाचे झाल्यास समाजाला सुधारणे अधिक गरजेचे आहे हे त्यांच्या ऐतिहासिक विश्लेषणाचे सार होय.

**ब्रिटिश राजवटीबद्दल त्यांची भूमिका -**

न्या. रानडे हे पाश्चात्त्य ज्ञानाने भारावलेले, इंग्रजीरूपी वाघिणीचे दूध प्यालेले, व्यक्तिस्वातंत्र्यवादी, बुद्धिप्रामाण्य मानणारे विवेकनिष्ठ उदारमतवादी अशा तरुणांचे प्रतिनिधी होते. मानवी व्यक्तित्वाचा आदर आणि त्यातून आलेला समतेचा विचार हा न्यायमूर्ती रानड्यांचा इतिहास चिंतनाचा गाभा होता. परकीय राजवटीला न्या. रानडे दैवी अनुग्रह मानीत असा त्यांच्याबद्दल एक गैरसमज आहे. परकीय राजवटीबद्दल, ब्रिटिशांबद्दल, इंग्रजी शिक्षणाबद्दल, त्यातून आलेल्या शहाणपणाबद्दल, पाश्चात्त्यांविषयीच्या ज्ञानाबद्दल त्यांना कृतज्ञतेची जाण होती. ही त्यांची डोळस अशी जाण होती. इंग्लंडच्या राणीचा जाहीरनामा काही अंशी त्यांना हक्काची सनद बाटला पण त्याच इंग्लंडच्या प्रशासनावर १८९२ साली त्यांनी कडाडून टीकाही केली. इंडियन पोलिटिकल इकॉनामी या विषयावर तेव्हा ते बोलत होते. सामाजिक सुधारणांना अग्रक्रम देण्याची मागणी करताना न्या. रानडे यांची भूमिका अशी होती की जोवर समाजात पुरेशा सुधारणा होत नाहीत, एकात्मक राष्ट्र म्हणून जोवर आपण आपण उभे राहत नाही, तोवर ब्रिटिश राजवटीतून बाहेर पडण्याचा आततायीपणा करणे सर्वथा चुकीचे ठरेल.

**मराठ्यांच्या इतिहासावरील चिंतन -**

ग्रँट डफने लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासावरील इंग्रजी ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर खरे तर मराठ्यांवरील विस्तृत विवेचन करणारे लिखाण म्हणून त्याचे सर्वत्र स्वागतच झाले. मराठ्यांच्या इतिहासाचे कितपत वास्तव चित्रण या ग्रंथातून झालेय या कुतूहलापोटीही काहींनी तो ग्रंथ वाचला. कीर्तन्यांच्या टीकात्मक निबंधामुळे मराठी भाषिकांनी या ग्रंथाकडे अधिकच विवेचक दृष्टीने पाहिले. त्यातील गुणदोषांची चर्चा केली. न्या. महादेव गोविंद रानडेही गेली काही वर्षे मराठ्यांच्या इतिहासावर चिंतन करीत होते. पाश्चात्त्य जगात जसे प्रबोधन आणि धर्मसुधारणा घडून आली तसा काही प्रकार आपल्या भारताच्या इतिहासात घडला का याचा शोध न्या. रानडे घेत होते. त्या दृष्टीने त्यांनी आपले लक्ष मराठ्यांच्या इतिहासावर केंद्रित केले होते. सर्वांगीण सुधारणेची गरज सोदाहरण पटवून देण्यासाठी रानडे मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले. धर्मकारण, राजकारण आणि समाजकारण या सर्वच क्षेत्रात एकत्रित असा उठाव झाला म्हणून मराठ्यांचे स्वराज्य उदयाला आले असे त्यांचे मत बनलेले होते. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम या संतांच्या काव्याचाही त्यांचा अभ्यास होता. संत वाङ्मयाने केलेल्या लोकशिक्षणाची त्यांना जाणीव होती. मराठीतून तत्त्वज्ञान मांडणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या कार्याची महती त्यांना पटलेली होती. सनातन धर्म आणि रूढींच्या विरुद्ध, परंपरागत कर्मकांडाविरुद्ध, उच्चनीचतेच्या जाणिवांविरुद्ध संतांनी केलेले लोकशिक्षण न्या. रानडे यांना युरोपातील धर्मसुधारणेसारखे भासले. रामदास, तुकारामांसारख्या संतांच्या शिकवणुकीमुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक कार्यनिष्ठा जागवल्या गेल्या. राष्ट्रीय भावना चेतवल्या गेल्या. मराठी स्वराज्य प्रस्थापनेच्या प्रयत्नात प्रत्येक घर, प्रत्येक झोपडी हा सैनिकी तळ बनला. मराठी स्वराज्य प्रस्थापना ही चळवळ मूठभर धनिकांची, मध्यमवर्गीयांची वा जमीनदारांची न राहता ती लोकचळवळ झाली याचे कारण त्या काळात झालेले प्रबोधन होय अशी एकूण न्या. महादेव गोविंद रानड्यांच्या विचारांची मांडणी होती. मराठी संतांच्या वाङ्मयीन चळवळीची आणि एकूण भक्ती आणि वारकरी संपद्रायाच्या उदयाची तुलना ते युरोपातील धर्मसुधारणा चळवळीशी करीत असत. ग्रँट डफच्या लिखाणाची नोंद -

ग्रँट डफचा 'मराठ्यांचा इतिहास' प्रकाशित झाल्यावर अनेकांनी या ग्रंथावर प्रतिक्रिया दिल्या. डेक्कन कॉलेजातल्या बी. ए. च्या वर्गातल्या कीर्तने या नावाच्या विद्यार्थ्यापासून ते वि. का. राजवाड्यांपर्यंत अनेकांनी या ग्रंथावर आपली मते व्यक्त केली. न्या. रानडे यांनीदेखील या ग्रंथाची नोंद घेऊन वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यानाच्या निमित्ताने ग्रँट डफच्या प्रतिपादनावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. १८९४ साली वसंत व्याख्यानमालेतून त्यांनी मराठ्यांच्या सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी मोठ्या समर्पकपणे मांडली. न्या. रानडे यांना ग्रँट डफच्या लिखाणातून काही गोष्टी खटकल्या. मराठ्यांच्या स्वराज्य स्थापनेची नेमकी धडपड आणि त्या धडपडीमागच्या प्रेरणा ग्रँट डफला उमगल्याच नाहीत ही गोष्ट न्या. रानड्यांना प्रकर्षाने जाणवली. सह्याद्रीच्या जंगलात अचानक वणवा पेटावा अणि पाहता पाहता त्याने सारा परिसर व्यापावा असे काहीसे झाल्याचे ग्रँट डफने मराठी सत्तेचा उदय रेखाटताना नोंदवले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाची कल्पना नसल्यानेच ग्रँट डफचा हा चुकीचा समज झाला आहे आणि प्रत्यक्षात मराठी सत्तेचा उदय ही कशी एक सूत्रबद्ध योजना होती हा विचार न्या. रानड्यांनी आपल्या व्याख्यानातून मांडला. पुढची पाच सहा वर्षे ते सतत मराठी सत्तेच्या उदयाविषयी चिंतन करीत राहिले. तशा इतरही सुधारणावादी चळवळी चालू होत्याच. प्रार्थना समाज, सार्वजनिक सभा यांच्यातील कार्याची व्यग्रताही होतीच. ग्रँट डफच्या लिखाणामुळे मराठ्यांच्या इतिहासाविषयी काही चुकीचे समज प्रस्तुत होताहेत. मराठे हे चोर लुटारू म्हणून संबोधिले जाताहेत. एकूण भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेल्या मराठी सत्तेची नोंद पुरेशा गांभीर्याने ग्रँट डफने घेतली नाही याची खंत न्या. रानड्यांना होती. ग्रँट डफचा ग्रंथ इंग्लंडमध्ये छापला गेल्यामुळे सर्व पाश्चात्त्य देशांत आणि इंडालॉजीकल सर्कल्समध्ये जो आवर्जून वाचला गेला. शिवाय मराठ्यांच्या इतिहासावरील तो पहिला अधिकृत ग्रंथ. या ग्रंथाला प्रभावीपणे उत्तर देणारा ग्रंथ लिहिण्याचा निश्चय न्यायमूर्ती रानड्यांनी केला आणि 'राईज ऑफ मराठा पॉवर' हा इंग्रजी ग्रंथ त्यांचे हातून पूर्ण झाला.

**न्यायमूर्ती रानड्यांचे इतिहास-लेखन** -

'राईज ऑफ मराठा पॉवर' हा न्यायमूर्ती रानड्यांनी लिहिलेला एकमेव ग्रंथ इ.स. १९०० साली प्रकाशित झाला. वस्तुतः संपूर्ण मराठी सत्तेचा उदय, विस्तार आणि अस्त रेखाटणारा ग्रंथ लिहिण्याची त्यांची योजना होती. पण प्रत्यक्षात मराठी सत्तेचा उदय तेवढा रेखाटला गेला. हा ग्रंथ लिहिताना ग्रँट डफचे लिखाण नजरेसमोर होते हे जरी खरे असले तरी न्यायमूर्ती रानड्यांनी ग्रँट डफवर टीका म्हणून ग्रंथलेखन केलेले नाही. ग्रँट डफच्या चुकांचा निर्देश रानडे करीत नाहीत. ग्रँट डफच्या विधानांना प्रभावीपणे उत्तरे देत मार्मिक अशी मांडणी त्यांनी केली आहे. ग्रँट डफचा मराठ्यांविषयी जो एक गैरसमज झाला व जो लिखाणातून अभिव्यक्त झाला तो गैरसमज दूर करण्याचा आणि मराठ्यांच्या इतिहासाचे नेमके सूत्र शब्दबद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न न्या. रानड्यांनी केला आहे.

१९ व्या शतकात भारताचा इतिहास लिहिण्याचेही काही प्रयत्न झाले त्या प्रयत्नांतूनही मराठ्यांच्या स्वराज्य प्रस्थापनेच्या इतिहासाला योग्य ते स्थान दिले गेले नाहीच. किंबहुना मध्ययुगीन भारताचा इतिहास म्हणजे मुस्लिम सत्तांच्या अनिर्बंध प्रशासनाचा इतिहास म्हणूनच पाश्चात्त्यांच्या इतिहास-लेखनात नोंदवला गेला. न्या. रानड्यांसारख्या बुद्धिवादी विवेकनिष्ठांना पाश्चात्त्यांनी केलेली इतिहासाची ही मांडणी योग्य वाटली नव्हती. प्रत्यक्षात परिस्थिती अशी होती की मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठी सत्तेला अनन्यसाधारण महत्त्व होते. ते महत्त्व लक्षात घेऊन न्या. रानड्यांनी इतिहास लेखन केले. ईस्ट इंडिया कंपनीची कागदपत्रे अभ्यासल्यावर एक गोष्ट स्पष्ट होत होती की मराठ्यांचा निःपात केल्याशिवाय इंग्रजांनाही भारत जिंकता आलेला नाही. औरंगजेबाप्रमाणे खरे तर इंग्रजांनाही असे वाटत होते की मराठ्यांची सत्ता संपवल्याशिवाय आपल्याला साम्राज्य टिकवता येणार नाही यातच मराठ्यांचे मोठेपण व त्यांचे सामर्थ्य सामावलेले आहे. या मोठेपणाची जाणीव इतर कुणाच्याच लिखाणात नव्हती. ग्रँट डफला तर मराठी सत्तेच्या उदयाचे गूढ उकललेले नव्हते. न्या. रानड्यांनी मराठ्यांच्या इतिहासाचे हे योगदान स्पष्ट करण्यासाठी खरे तर ग्रंथलेखन केले. मराठी सत्तेच्या उदयाचे गूढ उकलून दाखवण्यासाठी मराठी सत्तेचा उदय म्हणजे सह्याद्रीतला वणवा नव्हे, निव्वळ योगायोग नव्हे, केवळ दैवयोग तर नव्हेच नव्हे किंवा चोर लूटमारांची मोहीमही नव्हे तर एक सुसंगत असा स्वराज्य प्रस्थापनेचा प्रयत्न होय हे स्पष्ट करण्यासाठी मराठी सत्तेचा उदय त्यांनी रेखाटला. मराठ्यांच्या सत्तेचा उदय- एक अप्रतिम ग्रंथ -

न्यायमूर्ती रानड्यांनी 'राईज ऑफ मराठा पॉवर' हा अप्रतिम ग्रंथ लिहिला आणि भारताच्या मध्ययुगीन इतिहासात मराठ्यांना योग्य ते स्थान प्राप्त करून दिले. या ग्रंथाची रचना करताना न्या. रानड्यांनी नीरस रटाळ अशी इतिहास ग्रंथांची भाषा न वापरता अत्यंत आलंकारिक उपमा उत्प्रेक्षांची उधळण करणारी मोठी सुंदर इंग्रजी वापरली आहे. मराठी सत्तेच्या प्रस्थापनेला सीड संबोधून त्यातून वृक्ष कसा फुलतो, बहरतो हे स्पष्ट करीत मराठी सत्तेच्या उदयाचे मोठे आकर्षक वर्णन न्या. रानडे करतात. हा ग्रंथ मुळातूनच वाचला पाहिजे. अलीकडेच या ग्रंथाच्या मराठी भाषांतराचेही पुनर्मुद्रण झाले आहे. आपल्या प्रासादिक इंग्रजीतून न्या. रानड्यांनी मराठ्यांच्या उदयाचे तर्कशुद्ध मुद्देसूद प्रतिपादन केले आहे. प्रतिपादनाचा एकूण रोख असा की मराठ्यांच्या सत्तेचा उदय एक सुसंबद्ध अशी प्रक्रिया होती ज्या प्रक्रियेचा प्रारंभ संत ज्ञानेश्वर, एकनाथांपासूनच्या प्रबोधनातून आणि धर्मसुधारणांतून झाला. या काळातल्या लोकजागरणामुळे खरे तर भारतीय समाजात जागृती झाली. पुढील दोन तीनशे वर्षे ही प्रक्रिया चालू राहिली. बीज रुजले, अंकुरले,वृक्ष फुलला, बहरला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य प्रस्थापनेच्या रूपाने वृक्षाला फळे आली. मराठी सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी रेखाटणारे आणि दहाव्या अकराव्या शतकापासूनच्या घडामोडींचा आढावा घेणारे विवेचन या ग्रंथाच्या अर्ध्या भागात आहे. किंबहुना ही पार्श्वभूमी सांगणे हाच या ग्रंथाचा उद्देश आहे. मराठ्यांच्या इतिहासाविषयी जो एक गैरसमज ग्रँट डफच्या लिखाणामुळे पसरला होता तो बऱ्याच अंशी न्या. रानड्यांच्या ग्रंथामुळे दूर झाला. मराठ्यांच्या इतिहासाचे महत्त्व अभ्यासकांना जाणवू लागले. भारतीय इतिहासातील मराठी सत्तेचे योगदान नोंदवले जाऊ लागले. मराठ्यांच्या इतिहासाची साधने धुंडाळली गेली आणि हळूहळू मराठ्यांचा इतिहास प्रकाशात येत गेला.

**स्फुट शोधनिबंध** -

न्या. रानड्यांनी वेळोवेळी लिहिलेले शोधनिबंध पाहिले की त्यांच्या इतिहास चिंतनाची दिशा कळते. हिंदुस्थानच्या इतिहासातील स्थित्यंतरे रेखाटणारा विद्यार्थिदशेतला लेख त्यांच्या इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी दर्शवितो. शिवाजीच्या प्रशासन व्यवस्थेचे विवेचन करणारा लेख, मराठ्यांच्या उदय आणि विस्ताराचे विवेचन करणारा लेख हे सुचवितात की मराठ्यांच्या इतिहासाविषयी त्यांचे सतत चिंतन-मनन चालू होते. त्या चिंतनाला कोणत्याही मर्यादा नव्हत्या. इतिहासाच्या क्षेत्रात त्यांची प्रतिभा आणि प्रज्ञा स्वैरपणे संचार करीत. विल्यम द कॉन्कररवर त्यांनी लेख लिहिला. पेरोल रोजनिशीचे विवेचनही त्यांनी केले. पाश्चात्त्य जगासारखी प्रबोधन चळवळ आपल्याकडेही झाली हे प्रतिपादन करीत त्यांनी तुलनात्मक अशा स्वरूपाचेही लिखाण केले होते.

**न्या. रानड्यांच्या इतिहास-लेखनाची वैशिष्ट्ये** -

न्या. रानड्यांचा पिंड राजकीय विचारवंताचा असल्याचा उल्लेख आपण सुरुवातीलाच केला आहे. तसे पाहिल्यास रूढ अर्थाने ते राजकीय विचारवंतही नव्हते. तत्कालीन राजकारणाचे ते सव्यासाची अभ्यासक मात्र निश्चित होते. त्या मयदित ते इतिहास-चिंतकही होते. त्यांनी भारताच्या दुरवस्थेचे ऐतिहासिक विश्लेषण केले आणि राजकीय पारतंत्र्याबरोबरच इतर अनेक घटक या दुरवस्थेस कसे कारणीभूत आहेत हे मांडले. व्यक्ती विरुद्ध समाज याचा तुलनात्मक विचार रानडे यांनीच अत्यंत विस्ताराने केला हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य ठरावे. शासनापेक्षा समाजच अधिक जुलूम करतो. हा त्यांचा निष्कर्ष खरोखर वैशिष्ट्यपूर्ण आहे. डॉ. आंबेडकरांच्या शब्दांत लिहावयाचे झाल्यास, "ज्ञानाच्या व्याप्तीबद्दल, सुज्ञतेच्या आवाक्याबाबत आणि दृष्टीच्या टप्प्याबाबत ज्यांची रानड्यांशी तुलना होऊ शकेल अशी व्यक्ती भारताच्या इतिहासात एकंदरीत दुर्मिळ होय." असे म्हणावे लागेल.

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताच्या इतिहास लेखनाला काही प्रमाणात गती आली. मोगल- मराठा काळाचाही धांडोळा घेतला गेला. त्या काळापावेतो म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यावर मराठ्यांचा जो इतिहास उपलब्ध झाला तोही मुख्यतः मुसलमान इतिहासकारांनी लिहिल्याप्रमाणे किंवा इंग्रज इतिहासकारांना भावल्याप्रमाणे नोंदवला गेला. प्रत्यक्षात मराठ्यांनी मुसलमानांना पराभूत केले आणि कालांतराने मराठे इंग्रजांकडून

पराभूत झाले हे वास्तव असल्याने इंग्रज आणि मुस्लिम इतिहासकारांच्या नोंदी सर्वस्वी ग्राह्य मानता येणार नाहीत ही भूमिका घेऊन मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन सुरू झाले. ज्यांच्याविषयी हे ग्रंथ आहेत त्या मराठ्यांना नेमके काय म्हणायचे आहे याचा शोध फारसा गांभीर्याने अजून कुणी घेतलाच नव्हता. हा शोध घेण्यासाठी आता मराठी साधने, हस्तलिखित कागदपत्रे शोधणे सुरू झाले. दफ्तरखाने धुंडाळले गेले. इंग्रज इतिहासकारांनी मराठी साधनांचा कितपत उपयोग केला, ती त्यांना कितपत गावली हे समजून घेण्यासाठी त्यांचे इंग्रजी भाषेतले ग्रंथ वाचले गेले. ग्रँट डफचा इतिहासही मराठी अभ्यासकांनी

प्रारंभी वाचला तो याच दृष्टिकोनातून. ग्रँट डफच्या इतिहासाचे अत्यंत गांभीर्याने परीक्षण करणाऱ्या अभ्यासकांमध्ये आपण इतिहासाचार्य राजवाडे यांचा मागील प्रकरणात उल्लेख केला. राजवाड्यांनी ग्रँट डफच्या लिखाणातील त्रुटी धुंडाळल्या आणि आपल्या संशोधनातून त्या पूर्ण केल्या. राजवाडे यांची प्रज्ञा खरे तर भाषाशास्त्रीय संशोधनात अधिक गुंतलेली होती, हे जरी खरे असले तरी त्यांचा मूळ पिंड हा इतिहास संशोधकाचा होता. त्यांच्यातला हा साक्षेपी इतिहास-संशोधक कसा विकसित झाला हे त्यांच्या चरित्रातून पाहणे संयुक्तिक ठरेल.

**जन्म आणि बालपण** -

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचा जन्म कोकणातील वरसई या गावी इसवी सनाच्या १८६३ साली (आषाढ शुद्ध अष्टमी) झाला. त्यांचे बालपण तसे वरसईतच गेले. विश्वनाथाच्या वयाच्या तिसऱ्या वर्षीच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. घराणे तसे मध्यवर्गीय चित्पावनांचे. मूळचे कदाचित राजवाडीचे म्हणून राजवाडे. वडिलांच्या मृत्यूनंतर विश्वनाथाचे बालपण काही काळ आजोळी तर काही काळ वरसईत गेले. प्राथमिक शिक्षणासाठी विश्वनाथ आपल्या मोठ्या भावासह पुण्यास आला. तसे राजवाडे हे घराणे किल्लेदाराचे. लोहगडच्या किल्लेदाराचा वारसा त्यांच्या घरात चालत आलेला. राजवाड्यांचे वडील आणि आजोबा मात्र वकिली करीत. विश्वनाथ राजवाड्यांनी सारी प्रज्ञा संशोधनाच्या कार्याला वाहिली.

शालेय शिक्षणात विश्वनाथाच्या उच्च बुद्धिमत्तेचे दर्शन घडले. पण मुळातला स्वभाव धडपड्या. दंगामस्ती करणारा. दांडपट्टा, कसरती, व्यायाम, मल्लखांब यात विश्वनाथला विशेष रस. व्यायाम करून त्यांनी चांगले शरीर कमावले होते. इ.स. १८७६ साली विश्वनाथ राजवाडे गोखले हायस्कुलात दाखल झाले. पुढे क्रांतिकारक फडक्यांनी सुरू केलेल्या शाळेतही ते शिकले. पुण्यातल्या शालेय जीवनातला शिक्षकांचा त्यांचा अनुभव चांगला नव्हता. तत्कालीन शिक्षण व्यवस्थेचे विदारक दर्शन घडविणारा एक लेख त्यांनी लिहिला. आडमुठे पोटभरू पंतोजी आणि पाट्या टाकणारे शिक्षक त्याही काळात पुण्यात होते हे राजवाड्यांच्या विस्तृत लेखावरून लक्षात येते.

**महाविद्यालयीन शिक्षण -**

इ.स. १८८२ च्या जानेवारीत राजवाडे मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा पास झाले. एल्फिन्स्टन कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण चालू ठेवणे अशक्य झाले. त्यांनी कॉलेज सोडले आणि माध्यमिक शिक्षण देणारा खाजगी वर्ग चालवला. दोन वर्षांनी पुण्यात डेक्कन कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला. इ.स. १८८४ पासून १८९० पर्यंत म्हणजे तब्बल सहा वर्षे राजवाडे डेक्कन कॉलेजात शिकले. इ.स. १८९० साली बी. ए. झाले. कॉलेजात असताना पदवी अभ्यासक्रमासाठीच्या अभ्यासाशिवाय इतरही स्वैर वाचनातच त्यांचा वेळ अधिक जाई. डेक्कन कॉलेजचे समृद्ध ग्रंथालय त्यांना वाचनासाठी, चिंतनासाठी मननासाठी प्रेरित करीत राहिले. इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, साहित्य अशा विविध विषयांवर त्यांनी बाचन केले. डॉ. रामकृष्ण भांडारकरांसारखे इतिहासकार त्यावेळी डेक्कन कॉलेजात होते. त्यांचाही प्रभाव राजवाड्यांवर पडला. प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून सर्व प्राचीन पाश्चात्त्य तत्त्वचिंतकांचे तत्त्वज्ञान त्यांनी अभ्यासले. दरम्यान फार्सी भाषेचाही अभ्यास त्यांनी केला. इंग्रजी बोलण्याचा, लिहिण्याचा एवढेच नव्हे तर इंग्रजीत विचार करण्याचाही त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. प्लेटोचे 'रिपब्लिक' त्यांनी विद्यार्थिदशेतच वाचले होते; नव्हे त्याचे मराठी भाषांतरही केले.

ज्ञानसाधनेच्या निखळ हेतूने शिक्षण घेणारा, वाचन करणारा एक असामान्य विद्यार्थी म्हणून राजवाडे डेक्कन कॉलेजात राहिले. त्यामुळे परीक्षा, परीक्षांचा अभ्यास, परीक्षा देणे व पास होणे या गोष्टींना त्यांनी दुय्यम लेखले. इंग्रजी भाषेने आणि पाश्चात्त्य ज्ञानाने भारावलेले राजवाडे यांनी जेव्हा विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे टीकात्मक निबंध वाचले तेव्हा त्यांचा इंग्रजीवरचा भर कमी झाला. काव्येतिहासकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी राजवाड्यांच्या मनात स्वदेशीची जाण निर्माण केली. परशुराम तात्या गोडबोल्यांच्या काव्यांनी महाराष्ट्र सारस्वताचा अभिमान त्यांच्या मनात चेतवला. राजवाड्यांनी आपले सारे आयुष्य इतिहास, मराठी आणि साहित्याच्या संशोधनात घालवले.

**प्रबोधनाचा ध्यास -**

ज्या प्रबोधनामुळे आणि विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे पाश्चात्त्य जग मध्ययुगीन अंधकारातून बाहेर पडले त्या प्रबोधनाचे ज्ञान आपल्या बांधवांनाही व्हावे, आपल्या महाराष्ट्रातही प्रबोधन घडून यावे अशी तळमळ राजवाड्यांना होती. पदवीस्तरावर शिक्षण घेणारा हा तरुण समाजप्रबोधनाच्या विचाराने भारावला होता. मराठी माणसाने पाश्चात्त्यांचे हे आधुनिक युगाच्या उंबरठ्यावरील ज्ञान आत्मसात करावे आणि आधुनिक बनून जीवनाला सामोरे जावे असा त्यांचा प्रयत्न होता. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणजे त्यांनी सुरू केलेले मासिक 'भाषांतर' होय.

**'भाषांतर' मासिकाचे संपादन** -

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या कार्याचे एक प्रमुख अंग म्हणजे संपादन होय. तसेच राजवाड्यांनी प्रत्यक्ष इतिहास लेखन फार कमी केले. इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर चिंतन केले. इतिहासाची साधने संकलित केली. इतिहासाच्या साधनांचे संपादन केलेले असे शेकडो खंड आज उपलब्ध आहेत. राजवाडे यांच्या संपादन कार्याची सुरुवात १८९५ साली झाली. या वर्षी त्यांनी 'भाषांतर' नावाचे मासिक सुरू केले. या मासिकाच्या प्रारंभामुळे राजवाड्यांच्या जीवनातील एका ध्येयवादी पर्वाची सुरुवात झाली. हे मासिक सुरू करण्यामागची त्यांची भूमिका ही होती की या मासिकाच्या माध्यमातून जगातील श्रेष्ठतम अशा ग्रंथांची व त्या ग्रंथांतील विचारधनाची ओळख मराठी तरुणाला व्हावी. त्या दृष्टीने त्यांनी प्लेटो, ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांची भाषांतरे क्रमशः 'भाषांतर' मासिकातून छापायला प्रारंभ केला. प्लेटोचा गाजलेला ग्रंथ 'रिपब्लिक' काही प्रमाणात भाषांतरित झाला. दोन वर्षे राजवाड्यांनी या मासिकाचा उपक्रम मोठ्या जिद्दीने चालवला. पुढे मासिक बंद पडले. राजवाड्यांचा प्रबोधनाचा प्रयत्न मात्र अखंड सुरू राहिला.

**इतिहास संशोधन, ऐतिहासिक चिंतनाचे सार -**

राजवाड्यांचा पिंड एका विवेकनिष्ठ बुद्धिवादी चिंतकाचा. पाश्चात्त्यांच्या विचारांनी भारावलेला. भारतीय समाजानेही मध्ययुगीन अंधकारमय कालखंडातून बाहेर पडावे आणि नव्या युगाची प्रभातकिरणे पाहावीत असे त्यांना वाटे. पाश्चात्त्यांसारखे आपल्याकडेही प्रबोधन घडून यावे ही त्यांची मनोमन इच्छा. या प्रबोधनासठी राजवाड्यांनी इतिहासविद्येचा खरे तर ध्यास घेतला होता. भारतीय प्रबोधनासाठी राजवाड्यांना इतिहासाचे अधिष्ठान हवे होते. इतिहासाचा आधार घेतल्याशिवाय प्रबोधनाची पाश्र्  वभूमी कळणार नाही आणि प्रबोधनाची मानसिकता तयार होणार नाही असे त्यांना रास्तपणे वाटे.

१४ व्या शतकातील युरोप आणि १९ व्या शतकातील भारत या उभयतांची पार्श्वभूमीच पूर्णपणे भिन्न आहे. या पार्श्वभूमीत खरे तर प्रबोधनाची मुळे आहेत. ही पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय प्रबोधनाचा विचार करता येणार नाही. ही पार्श्वभूमी समजण्यासाठी इतिहासाचे अधिष्ठान हवे ही राजवाड्यांची भूमिका. भारत हा परकीयांनी जिंकलेला असल्याने येथील माणसाची मनोवृत्तीच पराभूत बनली आहे. इतिहासाच्या धांडोळ्यातूनच आत्मस्मृती जागी होईल, अस्मिता चेतवली जाईल आणि प्रबोधनाचे जागरण घडेल अशी ही एकूण त्यांची वैचारिक मांडणी होती. राजवाड्यांना भारतीयांच्या मागासलेपणाचे सतत भान होते, तसेच पाश्चात्त्यांच्या प्रगतीचीही जाण होती. त्याच अनुषंगाने त्यांनी भारताच्या पराभवाची आणि पाश्चात्त्यांच्या विजयाची कारणमीमांसा केली आहे. सद्य परिस्थितीतून म्हणजे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी भारतीयांना आधुनिक वैज्ञानिक संस्कृतीचे, बुद्धिवादी

विवेकनिष्ठेचे बळ आवश्यक आहे असे त्यांना वाटे. वैज्ञानिक दृष्टी स्वीकारल्याशिवाय, आत्मस्मृती जागृत झाल्याशिवाय, अस्मिता जागवल्याशिवाय भारतात नवजीवन येणार नाही असा त्यांचा विश्वास होता.

**इतिहास आणि ऐतिहासिक प्रसंग -**

राजवाड्यांचे इतिहास लेखन हे तसे प्रत्यक्ष मराठ्यांच्या किंवा महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीची नोंद करणारे इतिहास लेखन नव्हते. इतिहासाविषयी सखोल चिंतन करणारा विचार त्यांनी या लेखनातून मांडला.

मुळातच इतिहास या शब्दाची व्युत्पत्ती, व्याप्ती ते शोधतात. इतिहासाची त्यांची कल्पना विज्ञाननिष्ठ आहे, सर्वव्यापी आहे. सार्वदेशिक आणि सार्वकालिक स्थित्यंतरांची नोंद करणारे शास्त्र या दृष्टीने ते इतिहासाकडे पाहतात. 'विद्यासेवक' मासिकाच्या एका लेखातून त्यांनी इतिहासाची मूलतत्त्वे सांगितली आहेत.

राजवाड्यांच्या दृष्टीने इतिहास हा कृत्यपरंपरावाचक शब्द आहे. कृत्यपरंपरांची आंतर-बाह्य अशी मूळ कारणे शोधणे हे इतिहासाचे कार्य होय असे ते म्हणतात. इतिहासातली ही कृत्यपरंपरा स्थलकालबद्ध असते. भूतकाळात कोणत्याही घटनेचे, प्रसंगाचे वर्णन करावयाचे म्हणजे त्या प्रसंगाचा अथवा घटनेचा परिष्कार काळाने व स्थळाने पसरवून दाखवावा लागतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास तो प्रसंग स्थळ आणि काळ यांच्या चौकटीत बसवावा लागतो. या कॅनव्हासवर इतिहासकाराला तो प्रसंग पुनः रेखांकित करावयाचा असतो. स्थळ आणि काळाबरोबरच आणखी एक महत्त्वपूर्ण घटक कॅनव्हासवर येतो तो असतो व्यक्ती.

**स्थलकाल आणि व्यक्तीची सांगड -**

तात्पर्य असे की स्थल, काल आणि व्यक्ती सांची सांगड झाली की ऐतिहासिक प्रसंग घडतो. या घटनेची प्रसंगाची काही बाह्य आणि आंतर कारणे असतात. ही आंतरबाह्य कारणपरंपरा शोधणे ही एक शास्त्रशुद्ध प्रक्रिया आहे. विज्ञानाप्रमाणेच इतिहास ही एक शास्त्रशुद्ध ज्ञानशाखा असल्याने संशोधनाची एक विशिष्ट पद्धती विकसित झालेली आहे असे सांगून राजवाड्यांनी इतिहास चिंतनाची भौतिकवादी भूमिका स्पष्ट केली. ऐतिहासिक प्रसंगांचे स्पष्टीकरण करताना इतिहासाचार्य राजवाडे यांनी व्यक्तीला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. व्यक्तींचा मिळूनच व्यक्तिसमूह, व्यक्तिसमुदाय बनतो आणि हाच व्यक्तिसमुदाय इतिहासाचा मूळ पाया असतो अशी भूमिका ते घेतात. व्यक्तिसमुदायातील लहान मोठ्या व्यक्तींची नोंद इतिहासाला करावीच लागते. एवढेच नव्हे तर बहुजनांचा समूहही अभ्यासावा लागतो, तेव्हाच इतिहास परिपूर्ण होतो, असे राजवाडे म्हणतात.

इतिहासाचार्य राजवाड्यांनी इतिहासाच्या तत्त्वचिंतनाचे अत्यंत सविस्तर असे विवेचन 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १' च्या संपादनानिमित्त लिहिलेल्या प्रस्तावनेतून केले आहे. प्लेटो, हेगेल आणि ऑगस्टस कॉम्त यांच्या इतिहास चिंतनाचा प्रभाव राजवाड्यांच्या विवेचनातून डोकावतो. व्यक्तिसमुदायाविषयी म्हणजे पर्यायाने समाजाविषयी अगदी मूलभूत चिंतन करीत राजवाडे यांनी मानवी शरीराचे रूपक वापरून वासना, यंत्रणा आणि साधना किंवा इच्छा या त्रिविध परंपरांची हकिगत म्हणजे इतिहास असे म्हटले आहे. वासनेचा निर्देश केल्याशिवाय शरीररूपी यंत्रणा का निर्माण झाली हे सांगता येत नाही व कार्याचा निर्देश केल्याशिवाय शरीररूपी यंत्रणेची लक्षणे ठरत नाहीत असा हा एकूण गुंता आहे. शारीरिक पद्धती रूपके वापरून राजवाडे हा गुंता स्पष्ट करतात.

**पाश्चात्त्यांच्या तत्त्वमीमांसेचा अंगीकार -**

एकोणिसाव्या शतकाअगोदर दोन शतके पाश्चात्त्य देशांत जी इतिहास तत्त्वमीमांसा चालू होती ती तत्त्वमीमांसा डोळसपणे अंगीकारणारा पहिला भारतीय इतिहास संशोधक म्हणून राजवाड्यांचा उल्लेख केला पाहिजे. ते स्पष्टपणे लिहितात की आधुनिक काळापूर्वी जे इतिहास लेखन झाले त्यांनी केवळ भूतवृत्तानुवाद दिले. त्यातही विशिष्ट व्यक्ती, कुल, वंश, संप्रदाय, धर्म, राष्ट्र, घटना, प्रसंग यांचे महत्त्व बाढवण्याच्या अंतस्थ हेतूने हे भूतवृत्तानुवाद लिहिले गेले. एखाद्याचे महत्त्व वाढवताना इतर कुणासंदर्भात क्षुद्र हेत्वारोपही झाले. हवी तेथे अवास्तवाची,

अतिशयोक्तीची भर टाकली गेली. आधुनिक काळापूर्वीचा इतिहास हा असा व्यक्तिनिष्ठ होता. खरे तर हे इतिहास लेखन नव्हतेच. राजवाडे स्पष्टपणे म्हणतात की इतिहास हा पूर्वग्रहरहित आणि प्रामाणिकपणे लिहिला जावा. निर्लेप आणि निरहंकारपणे विचार करून आणि सर्व अर्धवट अशा पूर्वग्रहांचा त्याग करूनच इतिहासाचे खरे आकलन होऊ शकते. त्यांना बखर वाङ्मय हे इतिहासाचे साधन वाटत नाही कारण त्यात अनेक ठिकाणी अवास्तवता आणि अतिशयोक्ती दिसते तसेच व्यक्तिनिष्ठता ठायी ठायी व्यक्त होते.

**हस्तलिखितांचा धांडोळा -**

इतिहासाचार्य राजवाड्यांची संशोधनयात्रा खरे तर वाईपासून सुरू होते. ग्रँट डफचा 'मराठ्यांचा इतिहास' प्रकाशित झाला होता. त्यातील अनेक त्रुटींचा निर्देश राजवाड्यांनी आपल्या लेखातून केला होता. प्रश्न केवळ त्रुटींच्या निर्देशनाचा नव्हता तर ती त्रुटी नवी माहिती मिळवून साधने धुंडाळून भरून काढण्याचा होता. ग्रँट डफच्या लिखाणावरून एक गोष्ट स्पष्ट होती की उपलब्ध कागदपत्रांआधारे मराठ्यांचा इतिहास लिहिला गेलाय खरा, पण तो अपुरा आहे. तो अपुरा का आहे तर ज्या गोष्टीबद्दल माहितीच उपलब्ध नाही, त्या गोष्टीबाबत तो अपुरा आहे. उदाहरणार्थ १७५० ते १७६१ या काळाविषयी फारच त्रोटक माहिती ग्रँट डफच्या ग्रंथात येते. राजवाड्यांनी त्या दृष्टीने म्हणजे त्या काळासंदर्भातल्या हस्तलिखितांचा धांडोळा सुरू केला आणि बाईतच त्यांना एक दुर्मिळ असा कागदपत्रांचा संग्रह गावला. वाईजवळच्या एका खेड्यात एरंडे यांच्या संग्रही पानिपताची काही अस्सल कागदपत्रे राजवाड्यांना मिळाली. ३०४ महत्त्वाची पत्रेही त्यात होती. १८९८ साली राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा पहिला खंड संपादित केला आणि ग्रँट डफ साहेबाला माहीत नसलेली माहिती प्रकाशात आणली.

**मेणवली दफ्तर -**

बाईजवळ मेणवली या गावी इतिहासाचार्य राजवाडे यांना नाना फडणीसांच्या कागदपत्रांचा प्रचंड संग्रह सापडला. हा संग्रह 'मेणवली दफ्तर' म्हणून ओखळला जातो. मराठ्यांच्या इतिहासातील अनेक दुर्लक्षित आणि अज्ञात पदर मेणवली दफ्तरातील कागदपत्रांतून राजवाड्यांनी उलगडले आहेत. मेणवली दफ्तरातील कागदपत्रांचे संपादन करून त्यांनी ती कागदपत्रे प्रकाशात आणली. संपूर्ण मेणवली दफ्तर असे प्रकाशित झालेले नाही. या दफ्तरातील अनेक महत्त्वाची कागदपत्रे राजवाड्यांनी संपादिली व ग्रंथमालेतून भारत इतिहास संशोधन मंडळाच्या इतिवृत्तातून इतिहास आणि ऐतिहासिकातून प्रकाशित केली. राजवाड्यांच्या शोधयात्रेतील मेणवली दफ्तराचा शोध महत्त्वपूर्ण ठरतो.

**सूर्याजी पिसाळांची कागदपत्रे -**

हस्तलिखित कागदपत्रांचा शोध घेत जहागीरदार वतनदारांच्या वाड्या, गढ्या धुंडाळत, लादन्यांतून, संदुकांतून सांभाळलेली कागदांची बाडे पाहत इतिहासाचार्य राजवाडे यांनी अख्खा महाराष्ट्र पायाखाली घातला होता. अशाच शोध प्रयत्नात ओझर्डे गावी त्यांना पिसाळांकडे मराठेशाहीतील काही हस्तलिखितांच्या स्वरूपातली कागदपत्रे असल्याचे कळले. कागदपत्रे कुटुंबियांनाही माहीत नव्हती. ज्याअर्थी हे कागद सांभाळून संदुकातून ठेवले आहेत त्या अर्थी त्यात महत्त्वाचे काहीतरी असणार अशी सामान्यतः मानसिकता असते. तशी ती पिसाळ कुटुंबियांची पण होती. बऱ्याच आर्जवानंतर राजवाड्यांना ती कागदपत्रे अभ्यासायला मिळाली. वाड्यातच बसून त्यांनी ती नकलून घेतली. मराठेशाहीतील एका गद्दाराचा शोध या कागदपत्रातून लागला. सूर्याजी पिसाळ हा मोगलांशी फितूर झाला आणि मराठी राज्याशी त्याने गद्दारी केली होती ही गोष्ट राजवाड्यांच्या लेखातून स्पष्ट होताच पिसाळांनी ही कागदपत्रे त्यांच्या हवाली करण्यास नकार दिला.

**बीडला सापडलेली ज्ञानेश्वरीची प्रत -**

हस्तलिखितांचा शोध घेत घेत राजवाडे मठ, मंदिरे, गढ्या व वाडे धुंडाळून महाराष्ट्रभर पायपीट करीत होते. अशाच एका भ्रमंतीत ते बीडला येऊन पोहोचले. इसवी सनाचे १९०३ साल होतेते. बीडला चंपावती किल्ल्याच्या

पायथ्याशी तटबंदीला लागून पाटांगण नावाचा एक मठ आणि देवस्थान होते. आजही तो मठ आहे. या मठाचे मठाधिपती मथुरादास गोसावी यांनी राजबाड्यांना ज्ञानेश्वरीची एक प्रत आपल्या हस्तलिखित बाडातून काढून दाखवली. सहाशे चौरेचाळीस पानांच्या या पोथीच्या शेवटी खालील श्लोक लिहिलेला होता.

श्रीसद्‌गुरुमुकुन्देन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा । विद्याधराय शिष्याय स्वीदा स्वत्व न शोभते ।।

या श्लोकावरून ही ज्ञानेश्वरीची प्रत मुकुंद नावाच्या सद्‌गुरूने विद्याधर नामक आपल्या शिष्याला दिली असे सूचित होते. राजवाडे यांच्या मते मुकुंद नामक सद्‌गुरु म्हणजे मुकुंदराजच होत. ही प्रत मुकुंदराजांची होय म्हणजेच एकनाथपूर्वकालीन होय. ही प्रत ज्ञानेश्वरीच्या निर्मितीनंतर अठ्ठावीस वर्षांनी लिहिली गेलेली दिसते. त्या अर्थी ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रतींमध्ये ही सर्वात प्राचीन प्रत आहे.

बीडची ही ज्ञानेश्वरी प्रत मुकुंदराजांचा शिष्य विद्याधर ह्यांच्याकडून विश्वनाथ कोनेर घोलर देवनूरकर यांच्यामार्फत बीडच्या पाटांगण मठात आल्याची नोंद राजवाड्यांनी केली आहे. या ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखित प्रतीचे वैशिष्ट्य हे आहे की या ज्ञानेश्वरीत एकही फार्सी शब्द नाही. मुळात इ.स. १२९० नंतर महाराष्ट्रात इस्लामी आक्रमण झाले व त्यानंतर फार्सी भाषेचा प्रभाव जाणवू लागला. ज्ञानेश्वरीची मूळ शुद्ध प्रत म्हणजे ही मुकुंदराजांची पाटांगण प्रत होय. या प्रतीतील भाषा शके ११९५ च्या पंढरपूर शिलालेखाशी आणि शके ११२८ च्या शिलालेखातील भाषेशी मिळतीजुळती आहे. अक्षरांचे वळणही यादवकालीन शिलालेखातील अक्षरांप्रमाणे आहे.

राजवाड्यांना तंजावरलाही ज्ञानेश्वरीची आणखी एक प्रत सापडली. ती शके १५१५ साली नकललेली आहे. हीच प्रत नगरच्या भारद्वाजांनी नकलून घेतली होती त्यामुळे राजवाडे या प्रतीचा उल्लेख भारद्वाजी प्रत असा करतात. कुंट्यांनी एकनाथी प्रत संपादित केली. तात्पर्य, उपलब्ध झालेल्या ज्ञानेश्वरी या हस्तलिखित प्रतींचा क्रम लावायचा झाल्यास पहिली जुन्यात जुनी प्रत म्हणजे बीडची ही पाटांगणात जी मुकुंदराजाची प्रत म्हणून ओळखली जाते. त्यानंतर एकनाथी, भारद्वाजी, सोनारी, भराडी, उद्योधनाथी, माडगावकरी वगैरे वगैरे असा क्रम लागेल. राजवाडे यांनी इ.स. १९०७ साली ही ज्ञानेश्वरी संपादित केली. १०७ पानांची सविस्तर प्रस्तावना लिहून या प्रतीचा सविस्तर अभ्यास शब्दबद्ध केला. मराठी भाषेच्या व्युत्पत्तीविषयीचे, मराठीच्या भेद-पोटभेदांसंबंधीचे अत्यंत सूक्ष्म विवेचन या प्रस्तावनेत आले आहे.

**मराठी भाषेच्या उगमाविषयी** -

ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेनिमित्त राजवाड्यांनी मराठी भाषेचे व्याकरण, निरुक्त आणि मराठी सारस्वताचा इतिहास लिहिला. त्यांच्या मते पाणिनीच्या काळी म्हणजे इ.स.पू. १५०० (ते शकपूर्व १५०० असे म्हणतात.) च्या दरम्यान महाराष्ट्र देश आणि महाराष्ट्री भाषा नव्हती. हा सारा परिसर दंडकारण्य म्हणून ओळखला जात होता. त्यानंतर महाराष्ट्री भाषा उदयाला आली. शके ४५० मध्ये महाराष्ट्री भाषेचा अंत झाला आणि मराठी भाषा उदयाला आली. शके ६०२ पासून ते ११२८ पर्यंत मराठी भाषा महाराष्ट्रात प्रचलित होती. तत्कालीन चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादवांच्या शिलालेखांतून, ताम्रपटांतून अनेक मराठी शब्द आढळतात, असे रास्तपणे राजवाड्यांनी नोंदवले आहे. हस्तलिखित कागदपत्रांच्या शोध प्रयत्नातून मुकुंदराज, मुक्तेश्वर, दासोपंत, रघुनाथपंडित, जनी जनार्दन, शिवदिन केसरी असे मध्ययुगीन संतवाङ्‌मयाचे अनेक जनक प्रकाशात आले. त्यांच्या रचना प्रथमच लोकांसमोर आल्या. त्याचे सारे श्रेय इतिहासाचार्य राजवाड्यांना द्यावे लागेल.

मराठी भाषेच्या सर्वांगीण इतिहासाचा शोध बोली भाषेच्याही अंगाने त्यांनी घेतला. नागपुरी, वऱ्हाडी, पुणेरी, गंगथडी, गोवणी, कोकणी, मालवणी वगैरे प्रांतिक भेद तसेच ब्राह्मणी, कुणबाऊ, कातकरी, लाडी, परभी वगैरे जातीय भेद ध्यानी घेऊन त्यांनी मराठी भाषेची वाटचाल रेखाटली. भाषाशास्त्र आणि मराठी भाषेच्या क्षेत्रातले राजवाड्यांचे कार्य अधिक उत्तुंग आहे. व्युत्पत्तीच्या क्षेत्रात रेंगाळणाऱ्या भाषाशास्त्राला त्यांनी प्रत्यक्ष भाषाविषयक चिकित्सेच्या क्षेत्रात आणून सोडले असे म्हणणे अधिक रास्त ठरेल.

**राजवाडे यांचे इतिहास लेखन -**

इतिहासाचार्य राजवाड्यांचे इतिहासविषयक लेखन वाचल्यानंतर त्यांनी इतिहासस्वरूप ग्रंथ लिहिला नाही या म्हणण्यातला नेमका अर्थ कळून येऊ शकतो. रूढार्थाने राजवाड्यांनी भारताचा इतिहास लिहिला नाही, मराठ्यांच्या इतिहासाचा किंवा मुघलांच्या इतिहासाचा आढावा इतिहास ग्रंथाच्या रूपात घेतला नाही हे खरे आहे. त्यांनी लिहिलेले इतिहासविषयक लेख पाहिल्यास त्यांच्या इतिहास लेखनातील प्रतिभेची व्याप्ती लक्षात येते. अगदी वेदपूर्व, वेदकाळ आणि महाभारताच्या कालखंडापासून त्यांनी इतिहास विषयक चिंतन केले असून वेळोवेळी स्फुट लेखन निरनिराळ्या संशोधन पत्रिकांतून प्रकाशित केले आहे. यादव व यादवपूर्व काळावरील त्यांचे लेखन असेच सूक्ष्म आहे. दामाजीपंत आणि विठ्या महारावरील त्यांच्या लेखाने १९१६ साली सातारच्या दफ्तरातील एका मजहरातून महारांच्या हक्काची सनद प्रकाशात आणली. १९१८ साली राजवाड्यांनी सातवाहनकालीन व्यापारी शहरांपैकी तगराचा शोध घेतला.

शिवपूर्वकाळ, शिवकाळ आणि शिवोत्तर काळावरील त्यांचे जवळपास ५०-६० शोधनिबंध त्यांच्या इतिहास संशोधनाची आणि इतिहास लेखनाची साक्ष देतात. निव्वळ इतिहासविषयक लेखांचा विचार केल्यास ५०० पानांचा इतिहास आणि इतिहासविषयक लेखांचा एक खंड धुळ्यातून समग्र राजवाडे साहित्यातील ११ वा खंड म्हणून प्रकाशित झाला आहे.

**संपादन कार्य -**

हस्तलिखित कागदपत्रांचे संकलन करण्यासाठी महाराष्ट्राच्या खेडोपाडी हिंडून राजवाडे यांनी अत्यंत दुर्मिळ अशी इतिहासाची साधने जमविली. या साधनांचे संशोधन आणि संपादन केले. बीड येथील पाटांगण मठात सापडलेली ज्ञानेश्वरी इ.स. १९०७ ला त्यांनी संपादित केली. या ग्रंथाला लिहिलेल्या सविस्तर प्रस्तावनेत त्यांनी मराठी भाषेचा इतिहास, भाषाभेद याची सविस्तर चर्चा करीत ज्ञानेश्वरीच्या या प्रतीतील आशयाचा सशब्द अभ्यास केला आहे. हे संशोधन अत्यंत मौलिक असे ठरावे. या प्रतीच्या काळाला श्री. हर्षे आणि वि. अं. कानोले यांनी प्रतिवाद केला तर मोडक, नेने आणि इतर अनेकांनी दुजोरा दिला. निष्कर्ष विवाद्य ठरले तरी जुन्या हस्तलिखितांचे संशोधन कसे करावे, पाठनिश्चिती करताना, काळानिश्चिती करताना काय काळजी घ्यावी, हस्तलिखितातील भाषेवरून आणि शब्दरूपावरून तत्कालीन समाजस्थिती कशी धुंडाळावी याचा सुंदर वस्तुपाठ राजवाड्यांनी आपल्या संपादनातून सादर केला आहे. गाजलेल्या प्रस्तावना - राजवाड्यांच्या गाजलेल्या प्रस्तावनांपैकी 'राधामाधवविलास चंपू' या ग्रंथाला लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना सर्वात अधिक महत्त्वाची आहे. चिंचवडच्या विष्णुपंत खाडे यांच्या घरातल्या कागदपत्रांच्या गळाठ्यात राजवाड्यांना हे चंपू काव्य सापडले. हे काव्य शके १६०० च्या दरम्यान रचिले गेलेले दिसते. चंपूकाव्यातील पहिल्या पाच प्रकरणांत राधामाधवाचा विलास वर्णिलेला असून उर्वरित भागात शहाजीचे चरित्र वर्णिलेले आहे. या ग्रंथाच्या संपादनानिमित्त राजवाड्यांनी इतरही कागदपत्रांचा मागोवा घेत प्रस्तावनेतून शहाजीच्या समग्र जीवनाचा आढावा घेतला आहे. शिवपूर्व शहाजीपर्वावर नव्याने प्रकाश टाकणे हे या ग्रंथाच्या प्रस्तावनेचे खरे प्रयोजन होते ते पूर्ण झाले आहे.

१९२४ च्या दरम्यान राजवाड्यांनी महिकावतीची बखर प्रकाशित केली. वसईच्या शेषवंशी हिराहरी भंडारी यांच्या संग्रही ही बखर सापडली. या बखरीत उत्तर कोकणचा व त्या अनुषंगाने महाराष्ट्राचा इतिहास आला आहे. काशीच्या पराडकरांच्या संग्रहातील एका बाडात राजवाड्यांना 'रसरत्नदीप' या ग्रंथाचे मराठी रूपांतर मिळाले. बिठलु गलंडो याने हे रूपांतर केलेले होते. साधारणतः १३ व्या शतकाच्या सुमारास हे रूपांतर झाले असावे. या रसरत्नदीपाचे संपादनही उल्लेखनीय आहे. रसरत्नदीपकार रामदास यमुनाकाठचा- काष्ट्याचा राहणारा. त्याचाही सविस्तर शोध राजवाड्यांनी घेतला. निरंजनस्वामी कराडकरांचे चरित्र, करणप्रकाशावरील टीका यांसारखी आणखी काही संपादने राजवाड्यांनी प्रकाशित केली. 'भाषांतर' या मासिकाच्या संपादनाचा उल्लेख यापूर्वीच आलेला आहे. तात्पर्य, १८९० ते १९२६ पर्यंतच्या कालखंडात राजवाडे त्यांच्या संशोधन यात्रेत कागदपत्रांच्या धांडोळ्यात, चिंतनात, मननात आणि संपादन लेखन कार्यात व्यग्र राहिले. इतिहास, साहित्य आणि भाषा ही त्यांच्या संशोधनाची प्रमुख क्षेत्रे. पाश्चात्त्य देशांत

चालू असलेली इतिहास-तत्त्वमीमांसा अंगीकारणारा पहिला भारतीय इतिहास संशोधक म्हणून राजवाड्यांचा उल्लेख करणे रास्त ठरेल.

**पारसनीस, दत्तात्रेय बळवंत :**

(२७ नोव्हेंबर १८७०-३१ मार्च १९२६). महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध इतिहाससंशोधक व ऐतिहासिक साधनांचे संग्राहक. जन्म बोरगाव ता. कोरेगाव जि. सातारा येथे. आईचे नाव बयाबाई. पारसनीसांचे घराणे मूळचे सातारा जिल्ह्यातील मलवडीचे. बळवंतराव महसूल खात्यातील नोकरीनिमित्त साताऱ्यास आले व तेथेच हे कुटुंब स्थायिक झाले. पारसनीसांचे शिक्षण इंग्रजी सहावीपर्यंत झाले. त्यांच्या पत्नीचे नाव आनंदीबाई. त्यांना सहा मुलगे व दोन मुली झाल्या. पारसनीसांनी १८८७ मध्ये महाराष्ट्र कोकिळ हे मासिक सुरू केले. त्यातून मराठेशाहीतील पराक्रमी प्रसिद्ध व्यक्ती आणि त्यांच्याशी संबंधित कागदपत्रे प्रसिद्ध होत. १८९२ पर्यंत हे मासिक चालू होते. किर्तीमंदिर (१८९०) व झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचे चरित्र (१८९४) ही दोन पुस्तके त्यांनी अस्सल कागदपत्रांच्या आधारे लिहून प्रसिद्ध केली. ऐतिहासिक साधनांचे संशोधन आणि संग्रह करीत असतानाच त्यांतील निवडक व महत्त्वाची कागदपत्रे प्रसिद्ध करता यावीत, म्हणून त्यांनी ह. ना. आपटे यांच्या सहकार्याने भारतवर्ष (१८९९-१९००) व पुढे स्वतंत्र रीत्या इतिहास संग्रह (१९०८-१६) ही नियतकालिके चालविली. यांतून सहा हजारांहून अधिक अस्सल कागदपत्रे त्यांनी प्रसिद्ध केली.

लेखन संशोधनाच्या कार्यामुळे पारसनीसांचा अनेक संस्थानिकांशी घनिष्ठ संबंध आला. कोल्हापूरच्या छ. शाहुंबरोबर इंग्लंडला जाण्याची संधी त्यांना १९०२ साली लाभली. या प्रवासात यूरोपातील वस्तुसंग्रहालयांतील अनेक महत्त्वाच्या चित्रांची छायाचित्रे त्यांनी घेतली होती. तसेच ब्रिटिश सनदी अधिकाऱ्यांशीही त्यांचे निकटचे संबंध होते. त्यामुळे पेशवेकालीन दप्तर पाहण्याची संधी त्यांना लाभली होती. त्यांच्याच प्रेरणेने व प्रयत्नांनी सातारा येथे १९२५ मध्ये ऐतिहासिक संग्रहालय स्थापन झाले. १९३९ साली हे संग्रहालय त्यातील कागदपत्रांसह पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात हलविण्यात आले. उर्वरित खाजगी संग्रह १९७५ साली मराठवाडा विद्यापीठास विकण्यात आला. पारसनीसांच्या संग्रहात मराठेशाहीतील विशेषतः अठराव्या शतकातील घटनांसंबंधीची अनेक अस्सल कागदपत्रे होती त्याचप्रमाणे जुनी नाणी, चित्रे, कलाकुसरीच्या वस्तू, पोषाख आणि पेहराव आदींचे नमुने होते. ऐतिहासिक- पत्रे, हस्तलिखिते इत्यादींचाही विपुल संग्रह त्यांनी केला.

पारसनीसांचे लेखन विपुल आहे. त्यांनी नियतकालिकांतून प्रसिद्ध केलेली बहुतेक कागदपत्रे पुढे ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाली. त्यांच्या मराठी ग्रंथांतील ए. ओ. ह्यूम (१८९३), झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचे चरित्र (१८९४), महापुरूष ब्रम्हेंद्रस्वामी यांचे चरित्र व पत्रव्यवहार (१९००), दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ (१९०२), बायजाबाई शिंदे यांचे चरित्र (१९०२), मराठ्यांचे आरमार (१९०४), महादजी शिंदे याजकडील राजकारणे, खंड ५ (१९१५) इ. ग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे असून उल्लेखनीय आहेत. त्यांनी इंग्रजीत लिहिलेली सातारा (१९०९), महाबळेश्वर (१९१६), द सांगली स्टेट (१९१७), पुना इन बायगॉन डेज (१९२१), हिस्टरी ऑफ द मराठा पिपल, ३ खंड (सहलेखक सी. ए. किंकेड १९१२-२२) इ. पुस्तके प्रसिद्ध आहेत. अखेरचे पुस्तक वगळता उरलेली पुस्तके विविध ऐतिहासिक स्थळांबद्दल माहिती देणारी आहेत. विशेषतः ब्रिटिश सनदी अधिकाऱ्यांना उद्देशून ती लिहिलेली आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ब्रिटिश सरकारने त्यांना रावबहादूर हा किताब दिला.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय प्रबोधनाचे जे युग अवतरले, त्यात इतिहास-संशोधन हे महत्त्वाचे क्षेत्र होते. हे काम करणाऱ्यांत पारसनीसांचे स्थान महत्त्वाचे आहे. आधुनिक इतिहासकारांना आवश्यक असलेला मीमांसक दृष्टिकोन त्यांच्या लेखनात कमी असला, तरी इतिहाससाधनांचे त्यांनी केलेले संशोधन-संग्रहकार्य मोलाचे आहे.

**वासुदेवशास्त्री खरे,:**

(५ ऑगस्ट १८५८—११ जून १९२४). मराठी ग्रंथकार व इतिहाससंशोधक. जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे. घराणे संस्कृतज्ञ. साताऱ्च्या अनंतशास्त्री गजेंद्रगडकरांकडे त्यांनी संस्कृत विद्याभ्यास केला. नंतर पुण्यास येऊन काव्येतिहाससंग्रह ह्या जुन्या ग्रंथांच्या जीर्णोद्धारास वाहिलेल्या मासिकाच्या संपादनकार्यात मदत करू लागले. त्यामुळे इतिहास संशोधनाची आवड निर्माण झाली.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर ह्यांनी स्थापिलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये काही काळ शिक्षक म्हणून नोकरी. त्यानंतर ते मिरजेच्या शाळेत शिक्षक झाले. त्यानंतरचे त्यांचे सारे आयुष्य मिरजेलाच गेले. इतिहास संशोधन हे त्यांचे जीवितकार्य असले, तरी काव्य-नाटकादी साहित्यरचनाही त्यांनी केली आहे. पंडिती काव्यरचनेचा आणि शीघ्रकवित्वाचा नाद त्यांना विद्यार्थिदशेपासूनच होता. त्यांनी स्वत:ही काव्यरचना केली आहे. समुद्र (१८८४), यशवंतराय महाकाव्य (१८८८) आणि फुटकळ चुटके (१८९०) हे त्यांचे काव्यग्रंथ. शिवाजी-संभाजी ह्या पितापुत्रांच्या संबंधांवर लिहिलेले गुणोत्कर्ष (१८८५) हे त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर इतिहाससंशोधन करीत असता, आवश्यक ते आर्थिक स्थैर्य लाभावे, यासाठी त्यांनी बरेचसे नाट्यलेखन केले. तारामंडळ (१९१४), चित्रवंचना (१९१७), शिवसंभव (१९१९), उग्रमंगल (१९२२) आणि देशकंटक (१९३०) ही त्यांची काही नाटके, गुणोत्कर्ष आणि शिवसंभव ही नाटके ऐतिहासिक परंतु त्यांच्या इतर नाटकांत अद्‌भुततेला व अतिरंजनाला स्वाभाविक वाव असूनही त्यांत संभाव्यता आणि प्रासादिकता राखण्यात ते यशस्वी झाले आहेत.

नाना फडनविसांचे चरित्र (१८९२) हे इतिहासक्षेत्रातील त्यांचे पहिले पुस्तक. त्यानंतर संशोधन-संपादन प्रकाशनाचा प्रचंड उद्योग त्यांनी केला. १८९७ मध्ये ऐतिहासिक-लेख-संग्रह हे मासिक काढून ते तीन वर्षे चालविले. पटवर्धन जहागिरदारांच्या जुन्या चिटणीशी दप्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाच्या कागदपत्रांतून ऐतिहासिक लेख संग्रहाचे चौदा खंड सिद्ध केले. पहिले अकरा खंड त्यांनी स्वत: आणि शेवटचे तीन खंड त्यांच्या निधनोत्तर त्यांचे चिरंजीव य. वा. खरे ह्यांनी संपादिलेले आहेत. ह्या लेखसंग्रहाच्या प्रस्तावना, तसेच न. चिं. केळकरकृत मराठे व इंग्रज (१९१८) ह्या ग्रंथाची प्रस्तावना ह्यांवरून वासुदेवशास्त्र्यांचा व्यासंग, विद्वत्ता आणि साक्षेपीपणा दिसून येतो.

अधिकारयोग अथवा नानास राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास (१९०८), इचलकरंजी संस्थानचा इतिहास (१९१३), मालोजी व शहाजी (१९२०), मराठी राज्याचा उत्तरार्ध (खंड पहिला, १९२७) ही त्यांची इतर ग्रंथरचना. यांशिवाय हरिवंशाची बखर अथवा पटवर्धन सरदारांच्या हकिकती (१९०९) ह्या ग्रंथाचे संपादन त्यांनी केले आहे.

**सरदेसाई, गोविंद सखाराम :**

(१७ मे १८६५-२९ नोव्हेंबर १९५९). महाराष्ट्रातील एक थोर व्यासंगी इतिहासकार. त्यांचा जन्म सखाराम व गंगाबाई या दांपत्यापोटी गरीब शेतकरी कुटुंबात गोविल (रत्नागिरी जिल्हा) या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण शिपोशीत झाले. मॅट्रिकला रत्नागिरीला असताना गंगूताई कीर्तने या मुलीशी ते विवाहबद्ध झाले (१८८४). पत्नीचे नाव लक्ष्मीबाई ठेवण्यात आले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविदयालयातून ते बी. ए. झाले (१८८८) आणि बडोदयास सयाजीराव महाराजांकडे दरबारी वाचक-अध्यापक म्हणून महिना सत्तर रूपयांवर नोकरीस लागले (१८८९). सयाजीरावांबरोबर त्यांना परदेशाचा, विशेषतः यूरोपचा प्रवास करण्याची अनेकदा संधी मिळाली. महाराजांनी अध्यापकीय कामाबरोबर त्यांना काही वर्षे हिशोबनीस म्हणूनही काम दिले होते. साठाव्या वर्षी निवृत्तिवेतन घेऊन ते संस्थानी सेवेतून निवृत्त झाले (१९२५). सयाजीरावांच्या कडक शिस्तीमुळे त्यांच्यात कष्टाळूपणा आणि काटेकोरपणा आला. निवृत्तीनंतर ते पुण्याजवळ कामशेत येथे राहू लागले. उर्वरित जीवन त्यांनी इतिहासलेखन-वाचन आणि संकलन यांत व्यतीत केले. त्यांच्या इतिहासलेखनास बडोदयात असतानाच प्रारंभ झाला होता.

सयाजीरावांना वाचून दाखविणे आणि राजपुत्रांना शिकविणे हे त्यांचे संस्थानी सेवेतील मुख्य काम होते. त्यासाठी ते लेखी टिपणे काढीत. याच टिपणांनी पुढे रियासतींना जन्म दिला. त्यांची प्रथम मुसलमानी रियासत प्रसिद्ध

झाली (१८९८). याबरोबरच त्यांनी मॅकिआव्हेलीचा द प्रिन्स व प्राध्यापक सिली यांचा एक्सपान्शन ऑफ इंग्लंड या दोन ग्रंथांचे मराठीत अनुवाद केले.या नंतर इतिहास हेच त्यांचे जीवित कार्य ठरले आणि इ. स.१००० पासून १८५७ पर्यंतचा इतिहास त्यांनी संकलित केला.त्याचे ब्रिटिश व मराठी रियासत असे शीर्षक निवडून कालकमानुसार विषयवार खंड प्रसिद्ध केले. मराठी रियासत व ब्रिटिश रियासत या दोन रियासतींच्या खंडांच्या आवृत्त्या १९३५ पर्यंत निघाल्या. त्यानंतर स. मा. गर्गे यांच्या प्रमुख संपादकत्वाखाली पॉप्युलर प्रकाशनाने आठ खंडांत मराठी रियासतीची नवी आवृत्ती प्रकाशित केली (१९८८-१९९२). यात विविध इतिहासकारांनी नव्याने उजेडात आलेल्या साधनांचाही चपखल उपयोग केला आहे. रियासती व्यतिरिक्त सरदेसाई यांनी मुलांसाठी इतिहासविषयक व बालोपयोगी भारतवर्ष, महाराष्ट्राचा इतिहास, इतिहासाच्या सोप्या गोष्टी, हिंदुस्थानचा प्राथमिक इतिहास वगैरे पुस्तके लिहिली. सरदेसाई आणि जदुनाथ सरकार यांच्यात मैत्री होती, ती प्रदीर्घकाळ टिकली. जदुनाथांनी ‘सर्वश्रेष्ठ मराठयांचा विदयमान इतिहासकार’ असे सरदेसाईंना गौरवाने म्हटले आहे. छ. शिवाजी महाराजांच्या त्रिशत सांवत्सरिक उत्सवाच्या निमित्ताने त्यांनी शिवाजी सूव्हेनिअर (१९२७) या ग्रंथाचे संपादन केले. त्यांमुळे परप्रांतात त्यांची कीर्ती पसरली. गुजरातीत त्यांच्या काही ग्रंथांचे अनुवाद झाले. ब्रिटिश शासनाने १९२९ मध्ये त्यांच्याकडे पेशवे दप्तराच्या संपादनाचे काम सोपविले. त्यांना कृ. पां. कुलकर्णी, य. न. केळकर, वि. गो. दिघे यांसारखे अभ्यासू सहकारी लाभले. त्यामुळे पेशवे दप्तरातील असंख्य कागदपत्रांतील काही निवडक कागदपत्रांचे ४५ खंड प्रसिद्ध झाले (१९३०-३४). त्यांनी श्यामकांत या थोरल्या मुलाने शांतिनिकेतन व जर्मनी येथून वेळोवेळी पाठविलेली पत्रे श्यामकांतची पत्रे या शीर्षकाने प्रसिद्ध केली (1934). सरदेसाई यांनी विविध ज्ञानविस्तार, रत्नाकर, मनोरंजन, चित्रमयजगत, सह्याद्री, लोकशिक्षण इ. नियतकालिकांतून सु. २७५ लेख लिहिले. लोकशिक्षणाच्या डिसेंबर १९३२ च्या अंकात त्यांनी ‘राष्ट्रीय इतिहास : अर्थ, व्याप्ती आणि भूमिका’ या शीर्षकाचा लेख लिहून इतिहासशास्त्राचा अभ्यास, त्याचा उपयोग व दुरूपयोग, धर्म व राजकारण, इतिहास साधने व साध्य, नवीन संशोधन, संशोधक वगैरे मुदयांची मीमांसा केली आहे आणि अखेरीस राजकारणात धर्म आणू नये व हिंदु-मुस्लिमांच्या ऐक्यावर भर दयावा, असा उपदेश केला आहे. त्यांच्या पत्नीच्या निधनानंतर (१९४३) ते एकाकी झाले तथापि इतिहासलेखनाचे वत अखंडपणे त्यांनी चालू ठेवले आणि इंगजीत न्यू हिस्टरी ऑफ द मराठाज ( तीन खंड, १९४९) हा ग्रंथ प्रसिद्घ केला. याशिवाय त्यांनी मेन करंट्स ऑफ मराठा हिस्टरी व पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉडन्स (पाच खंड) हे गंथ डॉ. जदुनाथ सरकार यांच्या संपादन-सहकार्याने इंगजीत प्रसिद्ध केले. त्यांनी काव्येतिहाससंग्रहा तील पत्रे, यादया आणि भारतवर्ष व इतिहास संग्रह या नियतकालिकांतील महत्त्वाच्या कागदपत्रांचे संपादनही केले आहे. शिवाय परमानंदाच्या अनुपुराणा चे संपादन करून ‘गायकवाड ओरिएंटल सेरीज’मध्ये ते प्रसिद्ध केले.

सरदेसाई यांना अनेक मानसन्मान लाभले. ब्रिटिश शासनाने त्यांना प्रथम रावसाहेब (१९३३) व नंतर रावबहादूर हा किताब दिला (१९३८). ते मराठी साहित्य संमेलनाच्या १९३८ च्या निवडणुकीत स्वा. सावरकरांविरूद्ध अपयशी ठरले पण अहमदनगरचे अध्यक्षपद त्यांनी नाकारले (१९४३). राजवाडे संशोधन मंदिराने (धुळे) ‘इतिहास मार्तंड’ ही पदवी आणि सुवर्णपदक देऊन त्यांचा सत्कार केला (१९४६). पुणे विदयापीठाने त्यांना सन्मान्य डॉक्टरेट दिली (१९५१). त्याच वर्षी जयपूर येथील अखिल भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान त्यांना मिळाला. अखेरच्या दिवसांत त्यांनी माझी संसारयात्रा हे आत्मचरित्र लिहिले (१९५६). भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार दिला (१९५७). वृद्धापकाळाने त्यांचे कामशेत येथे निधन झाले.

सरदेसाई यांनी उपलब्ध साधनांवरून मराठयांचा इंग्रजी व मराठी भाषांत संपूर्ण सुसंगत समग्र इतिहास लिहिण्याचे काम केले. त्यांनी संशोधन असे फारसे केले नाही. त्यामुळेच त्यांच्यावर संकलनकार अशी टीका होते. त्यांच्या रियासतीत काही दोष, उणिवा किंवा तपशिलांच्या चुका चिकित्सक अभ्यासकाला आढळतात. तथापि त्यांनी संकलनाच्या आणि विवेचनाच्या ज्या दिशा दाखविल्या आहेत, त्यामुळे त्यांचे कार्य एक भक्कम पाया म्हणून नेहमीच महत्त्वाचे व चिरस्मरणीय राहील. म्हणूनच समाजाकडून रियासतकार ही सार्थ उपाधी त्यांना लाभली.

## डॉ. बालकृष्ण (१८८२-१९४०)

डॉ. बालकृष्ण हे लंडन विद्यापीठाचे प्रशिक्षित इतिहासकार होते.त्यांनी लिहिलेल्या कमर्शियल रिलेशन्स बिटवीन इंडिया ॲन्ड इंग्लंड, (१९२४) या ग्रंथाचे भारतातील आणि युरोपमधील विद्वानांनी चांगले स्वागत केले. १९२२ मध्ये कोल्हापूर संस्थानाने राजाराम कॉलेजची स्थापना केली. तेथे डॉ. बालकृष्ण रुजू झाले. नोकरीत असताना त्यांना महाराष्ट्राच्या, विशेषतः शिवाजीच्या इतिहासात रुची निर्माण झाली. आणि अठरा वर्षांच्या अथक परिश्रमांनी त्यांनी एक महान कार्य 'शिवाजी दि ग्रेट' हे शिवचरित्र ग्रंथ दोन खंडांत प्रसिद्ध केले. (मुंबई, १९३२) बटाव्हिआ आणि द हेग येथे जतन केलेल्या डच साधनांचा बालकृष्णांनी यामध्ये खूप उपयोग करून घेतला आहे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. त्याचबरोबर लंडन, गोवा, मुंबई, पाँडेचरी, मद्रास, तंजावर, सातारा इ. ठिकाणांची ऐतिहासिक कागदपत्रेही बालकृष्णांनी अभ्यासली होती. त्यांच्या मते, 'समकालीन विदेशी विद्वानांनी केलेले लेखन आणि कागदपत्रे यांचा स्थानिक भाषेतील साधनांचा समन्वय साधून, सत्याचे इतस्ततः विखुरलेले कण गोळा करून इतिहासाची मांडणी करणे आवश्यक आहे.' परंतु शिवाजीराजांच्या वंशजांसंबंधी डॉ. बालकृष्णांनी ज्या मुधोळच्या फर्मानांचा आधार घेतला होता त्याबद्दल ज्येष्ठ इतिहासकार जदुनाथ सरकारआणि सरदेसाई यांनी शंका व्यक्त केली होती, याचा उल्लेख मागे आलाच आहे.

डॉ. बाळकृष्णांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये, शिवचरित्राचा हेतू स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, "मराठा साम्राज्याचा कर्ता, शिवाजी याच्या व्यक्तिमत्त्वाच्या चांगल्या बाजू दाखविण्यासाठी हे लिखाण केले आहे. तसेच शिवाजीवर जे आरोप केले आहेत तेही तपासून पाहिले आहेत. लोकांना स्वातंत्र्य मिळवून देणारा, राज्य निर्माण करणारा आणि स्वराज्य स्थापण्यासाठी चिरंतन लढणारा असा हा शिवाजी राजा सर्वांचे स्फूर्तिस्थान ठरले पाहिजे."असे असले तरीही, बालकृष्णांचे शिवचरित्र सरकारांच्या 'शिवाजी'ची जागा घेऊ शकले नाही. त्याची दुसरी आवृत्तीही निघाली नाही. इतिहाससंशोधक डॉ. आप्पासाहेब पवारांच्या मते, या पुस्तकाचे लिखाण जरा वेगळ्या पद्धतीने झाले असते तर ते जास्त वाचनीय झाले असते. दुर्दैवाने इतिहासापेक्षा साधनग्रंथ असे या पुस्तकाचे स्वरूप झाल्यामुळे, त्यात ऐतिहासिक माहिती कमी आहे. म्हणूनच ज्या कालखंडाचे या पुस्तकात वर्णन आहे, त्या कालखंडाचा साधनग्रंथ म्हणून या दोन्ही खंडांचा अधिक उपयोग होऊ शकतो." या महत्त्वपूर्ण शिवचरित्रांशिवाय मराठी आणि इंग्रजीत अनेक शिवचरित्रे लिहिली गेली. शिवाजीची प्रभावी कारकीर्द, स्वराज्याची उभारणी इ. गोष्टी त्यात सांगितल्या गेल्या. त्यातील काहींचा उल्लेख शेवटी जोडलेल्या टीपांमध्ये केला आहे.